cmyk

## संपादकीय

### निवडणुकीचा बार दिवाळीनंतरच...

गत तीन वर्षांपासून राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याची सर्वांनाच उत्सुकता आहे. सर्व पक्षांनी या निवडणुकांची जय्यत तयारी सुरू केली आहे. राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुका टप्प्याटप्प्याने होणार असून या निवडणुकांचा बार दिवाळीनंतरच उडणार असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस निवडणुकीच्या प्रक्रियेला सुरुवात होणार असल्यामुळे डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात महापालिकेच्या निवडणुका होतील, असे त्यांनी स्पष्ट केले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१०४ | शुक्रवार, दि.८ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### राज्यातील २०७ तालुक्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस

मुंबई : संपूर्ण राज्यभरात १० दिवस उशिरा पेरण्या सुरू झाल्या. आता पावसाने पाठ फिरविल्याने विदर्भ–मराठवाड्यातील पिके संकटात सापडली आहेत. राज्यातील २०७ तालुक्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यात उन्हाचा चटका वाढल्याने पिके कोमेजत आहेत. पिकांची वाढ खुंटली आहे. अशा स्थितीत पिकांची वाढ करण्यासाठी लागणा–या खतांचा तुटवडा निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे किडींचे आक्रमण झाले आहे. यातून खरिपाच्या उत्पादनाला मोठा फटका बसण्याचा धोका आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा; मयत ऊसतोड मजुराच्या वारसाला १० लाखांची मदत देणार

# ऊसतोड मजुरांची ही शेवटची पिढी ठरावी

**बीड । प्रतिनिधी**

**ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून बीडची सुरुवातीपासून ओळख आहे. ही ओळख बदलण्याची गरज असून ऊसतोड मजुरांची ही शेवटची पिढी ठरली पाहिजे या दृष्टीने राज्य सरकार काम करीत आहे. ऊसतोड मजुरांच्या हिताचे निर्णय घेण्याचा आमचा प्रयत्न असून मयत ऊसतोड मजुरांच्या वारसांना यापुढे ५ ऐवजी १० लाख रुपयांची शासनाकडून मदत दिली जाणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी केली आहे. जिल्हा परिषद आणि सामाजिक न्याय विभागाच्या संयुक्त विद्यमाने ऊसतोड कामगार आरोग्य तपासणी शिबिर व मिशन साथी योजनेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.**



छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणात झालेल्या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, आ. सुरेश धस, आ. विजयसिंह पंडीत, आ. प्रकाश सोळंके, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, आ. नमिता मुंदडा, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, कल्याणराव आखाडे, डॉ. योगेश क्षीरसागर, माधव निर्मळ, अविनाश नाईकवाडे, सचिव राजेश देशमुख आदि उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, ऊसतोड कामगारांचा अपघातामध्ये मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांचे सानुग्रह ▶▶ पान २ वर

#### १७ सप्टेंबरला बीड–अहिल्यानगर रेल्वे धावणार

बीड–अहिल्यानगर रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून त्याची चाचणी देखील यशस्वी झाली आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनापासून (दि. १७ सप्टेंबर) बीड–मुंबई रेल्वे सुरु व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले. तसेच बीड–अहिल्यानगर–मुंबई ही रेल्वे सुरु करण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. यासंदर्भात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी आजच बोलणे झाले असून त्यांनी सुध्दा अनुकुलता दाखवली असल्याचे अजित पवार म्हणाले.

#### चुकीचे काम केल्यास चक्की पिसिंग अन् चक्की पिसिंग

जिल्ह्याला जास्तीत जास्त निधी आणण्याचा माझा प्रयत्न असून त्यातून मोठ्या प्रमाणात विकास कामे होणार आहेत. कंत्राटदाराने सुध्दा दर्जेदार कामे करण्यासाठी प्राधान्य द्यावे, यापुढे चुकीच्या कामाचे समर्थन होणार नसून सामाजिक शांतता भंग करण्याचा कोणी प्रयत्न करीत असेल तर तर प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी. मग तो कोणत्याही पक्षाचा नेता, कार्यकर्ता असला तरी त्याला दोन – तीन वेळा समजावून सांगा, नाही ऐकले तर मग चक्की पिसिंग अन् चक्की पिसिंग असे म्हणत अजित पवारांनी गैरप्रकार करणाऱ्यांना दम दिला.

#### धनंजय मुंडेंमुळेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे महामंडळ उभे

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी आयुष्यभर ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी व बीड जिल्ह्याच्या विकासासाठी काम केले. पुढील पिढीमध्ये धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे हे त्यांच्या या कामाचा वसा घेऊन काम करत आहेत. धनंजय हे सामाजिक न्याय खात्याचे मंत्री असताना ऊसतोड कामगारांच्या उन्नतीसाठी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करून त्याद्वारे धनंजय मुंडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. अर्थमंत्री म्हणून मी या महामंडळाला धनंजयच्या विनंतीवरून कायमस्वरूपी निधी मिळण्याची तरतूद करून दिली. धनंजयच्या प्रयत्नातून उभे राहिलेले हे महामंडळ ऊसतोड कामगारांच्या उन्नतीचे माध्यम ठरणार आहे असे प्रतिपादन पालकमंत्री अजित दादा पवार यांनी केले.

## थोडक्यात...

### उपराष्ट्रपतीपदाचा उमेदवार मोदी –नड्डा ठरवणार

नवी दिल्ली–पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जेपी नड्डा उपराष्ट्रपतीपदाचा उमेदवार ठरवणार आहेत. जगदीश धनखड यांच्या राजीनाम्यानंतर उपराष्ट्रीपद रिक्त आहे.

### नारळी पौर्णिमा–ज्येष्ठगौरी विसर्जनासाठी सुट्टी जाहीर

मुंबई–दहीहंडी–अनंत चतुर्दशी ऐवजी नारळी पौर्णिमा आणि ज्येष्ठगौरी विसर्जन निमित्ताने मुंबई शहरासह उपनगरातील राज्य शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयांना स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या डीजीआयपीआर विभागाकडून याबाबतची माहिती देण्यात आली आहे.

### अमेरिकेच्या टॅरिफनंतर मोदींची ठाम भूमिका

नवी दिल्ली–अमेरिकेच्या ५० टक्के टॅरिफनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठाम भूमिका मांडली आहे. शेतकरी, पशुपालक, मच्छिमारांच्या हिताशी कुठलीही तडजोड करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. मला वैयक्तिक किंमत मोजावी लागली तरी तडजोड करणार नाही, असे ते म्हणाले.

### सर्वेक्षणामुळे शेतकरी कर्जमाफी लांबणीवर?

मुंबई : विधानसभा निवडणुकांआधी महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र दीड वर्षांनंतरही हे आश्वासन अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही. फार्महाऊस बांधणाऱ्या शेतकरी कर्जमाफी नको अशी सरकारची भूमिका आहे. त्यामुळे खरे शेतकरी शोधण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे असे वक्तव्य महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. या सर्वेक्षणानंतर शेतकरी कर्जमाफीचा निर्णय होईल असे बावनकुळेंनी म्हटले आहे.

# बीड-लातूर शिक्षक भरती घोटाळा चौकशीसाठी एसआयटी गठीत!

**बीड । प्रतिनिधी**

**राज्यभर गाजत असलेल्या बोगस शालार्थ आयडी आणि शिक्षक भरती प्रकरणात राज्य सरकारने पुण्याचे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी गठीत केली असून या निर्णयामुळे बीड लातूर नागपूर नाशिक मुंबई येथील संस्थाचालक बोगस शिक्षक आणि शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी, उपसंचालक यांचे धाबे दणाणले आहेत.तर येत्या तीन महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेशात नमूद केले आहे.**

नागपूर जिल्ह्यात काही महिन्यांपूर्वी बोगस शालार्थ आयडी च्या माध्यमातून १००० पेक्षा जास्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाल्याचे प्रकरण उघड झाले त्यानंतर अशा पद्धतीने बोगस शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची भरती ही मराठवाडा विदर्भ पश्चिम महाराष्ट्र मुंबई या ठिकाणी देखील झाल्याच्या तक्रारी राज्य सरकारकडे प्राप्त झाल्या.राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यासहित अनेक आमदारांनी या भरती बाबत तक्रारी केल्यानंतर राज्य सरकारने स्पेशल एस आय टी ची घोषणा केली होती. राज्य सरकारने अधिवेशनात जाहीर केल्याप्रमाणे राज्यस्तरीय एसआयटी ची स्थापना केली असून पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षेतखाली ही समिती गठीत केली आहे. या समिती मध्ये पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा,सहसंचालक हारून आतार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक ▶▶ पान २ वर

# केंद्राच्या योजनेतून बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारतीसाठी निधी मंजूर



**बीड । प्रतिनिधी**

**पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत सन २०२५–२६ च्या वार्षिक आराखड्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायत इमारती मंजुर करण्यात आलेल्या असून नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्र खोली बांधण्यात येणार आहे. यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला असून आता या पाठपुराव्यामुळे गावांचा चेहरामोहरा बदलणार आहे.**

केंद्र शासनाने पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान या योजनेचे पुनर्गठन करुन राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना सन २०१८–१९ ते सन २०२१–२२ या कालावधीत राबविली आहे. सदर योजनेचा मुळ ▶▶ पान २ वर

#### या ग्रामपंचायतींचा समावेश

धोंडराई, नित्रूड, आडस, टाकरवण, जातेगाव, होळ, जिरेवाडी, बनसारोळा, बंगाली पिंपळगाव, मानूर, मोरेवाडी, तेलगाव, कोळगाव, जाटनांदूर, जवळगाव, सायगाव, सौताडा, मोगरा, आष्टा ह.ना., पाली, यूसफवडगाव, चेनई, केसापुरी, दादेगाव, पुस, गढी,पिंपळनेर, तिंतरवणी.

## जिवे मारण्याची धमकी देऊन अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**अंबड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीवर वारंवार बळजबरीने अत्याचार करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी गोंदी पोलिसांनी पोस्को कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून, आरोपीला ताब्यात घेऊन अटक केली आहे.**

२१ जुलै रोजी पीडित मुलगी घरात एकटी असताना आरोपी हनुमान बाबुराव गिरी हा गवत कापण्याच्या बहाण्याने घरात घुसला. त्याने मुलीवर अत्याचार केला. ही घटना कुणाला सांगितल्यास तिला व तिच्या कुटुंबीयांना ठार मारण्याची धमकी दिली. आरोपीने मुलीस धाक दाखवून गेल्या वर्षभरात तब्बल १० ते १२ वेळा अत्याचार केल्याचे तपासात समोर आले आहे. पीडितेच्या फिर्यादीवरून ५ ऑगस्ट रोजी गोंदी पोलिस ठाण्यात बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस पोलिसांनी अटक केली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे करत आहेत.

## श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता २८६ कोटींवरून होणार ३५१ कोटींचा!

### धनंजय मुंडेंनी मांडली अभ्यासपूर्ण माहिती; दादांचे मानले आभार

**बीड । परळी । प्रतिनिध**

पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री वैद्यनाथ प्रभूंच्या मंदिर व परिसराच्या विकास कामांचा आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे आढावा घेण्यात आला. यावेळी विकास आराखड्याच्या माध्यमातून सध्या सुरू असलेल्या व नव्याने हाती घेण्यात येणाऱ्या विकास कामांचे सादरीकरण करण्यात आले.



मंदिर व परिसराचा विकास करताना पौराणिक महत्त्व अबाधित राखून अभूतपूर्व विकास कार्य करण्यात यावे, अशा सूचना अजित दादांनी सर्व संबंधितांना दिल्या. वाहनतळ, मेरुगिरी पर्वत परिसरातील कामे, दर्शन मंडप, नंदी, शिव प्रतिमा, ;उद्यान, प्रवेशद्वारे यांसह लागणाऱ्या अधिकच्या जमीन अधिग्रहण करण्याची जबाबदारी यावेळी धनंजय मुंडे यांनी घेतली आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी करत आराखडा कामातील बारकावे सर्वांच्या लक्षात आणून दिले. ▶▶ पान २ वर

## ट्रम्प टॅरिफनंतर सोने विक्रमी पातळीवर

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**सोने आणि चांदीच्या दरात जोरदार तेजी पाहायला मिळाली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर जोरदार टॅरिफ लादल्यानंतर ही तेजी पाहायला मिळाली आहे.**

सर्राफा बाजारात सोने आणि चांदीच्या दरात जोरदार तेजी पाहायला मिळाली असून २४ कॅरेट सोन्याचे दर ५९६ रुपयांनी वाढून १००६७२ रुपयांवर पोहोचले. तर, चांदीच्या दरात ११५४ रुपये प्रति किलो अशी वाढ पाहायला मिळाली. चांदीचे दर आता ११३५७६ रुपयांवर पोहोचले आहेत. जीएसटीसह २४ कॅरेट सोन्याचे



दर १०३६९२ रुपयांवर पोहोचले आहेत. जीएसटीसह चांदीचे एका किलोचे दर ११६९८३ रुपयांवर पोहोचले आहेत. मंगळवारी चांदीचे जीएसटीशिवायचे दर ११२४२२ रुपयांवर पोहोचले होते. सोन्याचे दर १०००७६ रुपये होते. सोने दराने ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७.०० क्विंटल | २,३४० | २,७४६ | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड : ५६.०० क्विंटल | २,०५० | २,६०१ | २,३८७ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,४०१ | २,७३० | २,६०० |
| मुग: २.५० क्विंटल | ६,४११ | ६,९१० | ६,६६० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,१०० | ४,६११ | ४,३५५ |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ४,९०० | ६,१०१ | ५,५४६ |

## बीडमध्ये शिक्षकांच्या बदल्यात घोळ




**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेच्या भोंगळ कारभारामुळे शिक्षकांच्या ऑनलाईन बदली मध्ये मोठा घोळ असल्याची चर्चा आहे प्रामुख्याने या बदल्या ऑनलाइन होणार आहेत त्यासाठी एक सॉफ्टवेअर तयार असून प्रामुख्याने हाच शिक्षकाने अर्ज केला तर त्याचा क्रमांक मात्र फार मागे जातो वेळेवर सापडत नाही असे प्रकार घडत असल्याने आता शिक्षकच चिंतेत आहे.**

जिल्हा परिषदेमध्ये घोटाळा ही काही नवीन बाब नाही मात्र मध्यंतरी शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्या केल्यामुळे हे घोटाळे काहीशी कमी झाले असले तरी या ऑनलाइन मध्येही खाडाखोड करून मागेपुढे केले जात असल्याचे ऐकण्यात आहे आता अशा अनेक शिक्षकांना ज्यांचे पाच वर्षे झाले अशांना या शाळेवरून ▶▶ पान २ वर

## मुंडे पिता-पुत्राच्या प्रवेशाने मतदार संघ राष्ट्रवादीमय

### असख्य कार्यकर्त्यांसह राजाभाऊ मुंडे, बाबरी मुंडेंचा राष्ट्रवादीत प्रवेश



वडवणी । प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघात आ. प्रकाश सोळंके यांच्या रुपाने जनतेने राष्ट्रवादी काँग्रेसला साथ दिली असून आता मुंडे पिता–पुत्रांच्या प्रवेशाने माजलगाव मतदार संघ पुर्णत: राष्ट्रवादीमय झाला असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. राजाभाऊ मुंडे आणि बाबरी मुंडे यांच्या प्रवेशा प्रसंगी ते बोलत होते.

विधानसभा निवडणुकीत बाबरी मुंडे यांनी अपक्ष निवडणुक लढवून १८ हजार मते घेत जतनेचे आपल्याला आशिर्वाद असल्याचे दाखवून दिले होते. त्यामुळे फक्त वडवणीच नाही तर माजलगाव मतदार संघात मुंडे पिता–पुत्राला मानणारा वर्ग असल्याचे सिध्द झाले होते. राजाभाऊ मुंडे आणि बाबरी मुंडे यांचा असंख्य समर्थकांसह गुरुवारी वडवणी येथे प्रवेश सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी आ. विक्रम काळे, आ. प्रकाश सोळंके, रमेश आडसकर, डॉ. योगेश क्षीरसागर, जयसिंह सोळंके, राजेश्वर चव्हाण, बळीराम गवते आदि उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, मुंडे पिता–पुत्रांनी आतापर्यंत आपले आयुष्य जनतेच्या सेवेत वाहुन घेतले असून वडवणी शहरासह तालुक्याच्या विकासात त्यांचा मोठा हातभार आहे. त्यांची आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने माजलगाव मतदार संघात पक्षाची ताकद वाढली असून मतदारसंघ हा राष्ट्रवादीमय झाला आहे. मुंडे पिता–पुत्रांच्या प्रवेशामुळे येणाऱ्या काळात पक्षाला मोठा फायदा होणार असून सर्व कार्यकर्त्यांनी सुध्दा पक्षवाढीसाठी कामाला लागावे असे ते म्हणाले. ▶▶ पान २ वर

## लाडक्या बहिणींची प्रतिक्षा संपली!

**कोल्हापुर । प्रतिनिधी**

राज्यातील लाडक्या बहिणींना सरकारकडून मिळणाऱ्या हफ्त्याची वाट पाहावी लागत असून १५०० रुपये बँक खात्यात कधी जमा होणार, याचीच वाट पाहिली जात आहे. आता, महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेच्या हफ्त्याबाबत माहिती दिली आहे. लाडकी बहीण योजनेचा रक्षाबंधन पूर्वसंध्येला हप्ता द्यायला सुरुवात होईल, अशी माहिती आदिती तटकरेंनी दिली.



यावेळी पुढे बोलताना अदिती तटकरे म्हणाल्या, विशेष म्हणजे गतवर्षी रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने २ महिन्यांचा हफ्ता एकत्रितपणे दिल्याने महिलांना थेट ३ हजार रुपये मिळाले होते. मात्र, यंदा एकच हफ्ता मिळणार असल्याचे ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# निवडणुकीचा बार दिवाळीनंतरच...

गत तीन वर्षांपासून राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याची सर्वांनाच उत्सुकता आहे. सर्व पक्षांनी या निवडणुकांची जय्यत तयारी सुरू केली आहे. राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुका टप्प्याटप्प्याने होणार असून या निवडणुकांचा बार दिवाळीनंतरच उडणार असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस निवडणुकीच्या प्रक्रियेला सुरुवात होणार असल्यामुळे डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात महापालिकेच्या निवडणुका होतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

आगामी निवडणुकांचा आढावा घेण्यासाठी नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिका-यांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेत निवडणूकपूर्व तयारीची माहिती दिली. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले की, ४ महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. त्यानुसार मनपा, जिल्हा परिषद, नगरपालिका अशा सर्व निवडणुकांचा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने घेण्यात येईल. सर्व निवडणुका एकत्र घेतल्यास मनुष्यबळाची मोठी अडचण येणार आहे. त्यामुळे निवडणुका टप्प्याटप्प्याने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १ जुलै २०२५ नुसार जी मतदार यादी आहे, ती ग्रा धरली जाणार आहे. आता प्रारूप प्रभाग रचनेनुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे. आयोगाचे आयुक्त वाघमारे म्हणाले, ओबीसी आरक्षणासाठी लॉटरी पद्धत अवलंबण्यात येणार आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आरक्षण निश्चित असते. पण ओबीसी आरक्षणासाठी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार लॉटरी पद्धत अवलंबली जाणार आहे.

गत निवडणुकीतही ओबीसी आरक्षण होते. त्यावेळीही हेच तत्त्व पाळण्यात आले होते. यंदाही त्याची अंमलबजावणी केली जाईल. विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत १ जुलैपर्यंत राज्यात १० लाख मतदार वाढल्याचा अंदाज आहे. राज्यातील मनपा, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुका एकाच वेळी घेणे शक्य नसल्याचे आयुक्तांनी सूचित केले. ओबीसी आरक्षण सोडत पद्धतीने काढली जाईल. या निवडणुकीत व्हीव्हीपॅट यंत्राचा वापर केला जाणार नाही. महानगरपालिकेच्या एकाच प्रभागात मतदाराला चार उमेदवारांना मतदान करायचे असते. यात बराच वेळ जाऊ शकतो. यामुळे मतदारांच्या रांगा नियंत्रित करणे शक्य नसल्याचे ते म्हणाले. कोणतेही राज्य निवडणूक आयोग व्हीव्हीपॅट वापरत नसल्याचे वाघमारे यांनी स्पष्ट केले. या निवडणुकांसाठी मध्य प्रदेश निवडणूक आयोगाकडून मतदान यंत्र आणली जाणार आहेत. भविष्यात व्हीव्हीपॅटच्या प्रक्रियेत बदल झाला तर तसा बदल करण्यात येईल असेही वाघमारे यांनी सांगितले. मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार आहेत. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एकसदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे, तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवी मुंबई, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर यासह सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीपासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. निवडणुकीची प्रक्रिया ऑक्टोबरअखेर सुरू होईल आणि डिसेंबरचा शेवटचा आठवडा किंवा जानेवारीच्या सुरुवातीला संपेल. मतदान प्रक्रियेत ईव्हीएम मशिनच्या वापराबाबत सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या होत्या. त्या सर्व याचिकांवर सुनावणी करून न्यायालयाने ईव्हीएम विश्वासार्ह असल्याचा निर्णय दिला आहे. मतदार जागरूकता शिबिरांमध्ये नागरिकांना ईव्हीएम कशी काम करते याची माहिती व्हावी यासाठी त्याचा डेमो दिला जातो. हा मुद्दा आता जुना झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट मशिनचा वापर केला जात नाही. कारण जर चार उमेदवार निवडायचे असतील तर चार वेळा बीप देणे, प्रत्येक वेळी स्लिप यंत्रातून यावी लागणे, यामुळे मतदान प्रक्रिया फार वेळखाऊ होते.

परिणामी मतदारांची रांग लांबत जाते. उबाठा नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, आयोगाने व्हीव्हीपॅट रद्द करण्याचा जो निर्णय घेतला आहे तो अत्यंत तुघलकी पद्धतीचा आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक झाली पाहिजे ही आमची मुख्य मागणी आहे. यासाठी आम्ही ईव्हीएमला विरोध करत बॅलेट पेपरद्वारे मतदान घेण्याची मागणी करत आहोत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सतत पुढे ढकलल्यामुळे सर्वसामान्य जनतेला आपल्या समस्या घेऊन कुठे जायचे, असा प्रश्न पडला होता. पण आता कोर्टाच्या आदेशानुसार सर्व निवडणुका होणार, हे सर्वांना दिलासा देणारे आहे. एखादा मुद्दा घेऊन निवडणुकाच होऊ द्यायच्या नाहीत, हे लोकशाहीला मारक आहे. निव्वळ आरक्षणाची व प्रभागाची सीमा यावरून लांबवण्यात आलेल्या निवडणुका पार पडणार आहेत ही वार्ता आनंददायीच म्हणावी लागेल.

---

## शिवसैनिकांनो, आम्ही पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी–मंत्री ना. उदय सामंत



बीड । प्रतिनिधी

**स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा. तळागाळात जाऊन संघटना बांधणी करून पक्ष मजबूत करा. गरज पडेल तिथे आवाज द्या, अगदी शाखेच्या उदघाटनासाठी देखील आम्ही येऊ. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे साहेब आपल्यासोबत पूर्ण ताकदीने आहेत. असा विश्वास देत**

महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत साहेब यांनी बीड शिवसैनिकांमध्ये प्रचंड जोश निर्माण केला. काल दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील हॉ. ग्रँड यशोदा येथे दु २.३० वाजता महाराष्ट्र राज्य उद्योगमंत्री ना. उदयजी सामंत साहेब, शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी साहेब, शिवसेना उप नेते माजी खा. राहुलजी शेवाळे साहेब, शिवसेना उपनेते अर्जुनजी खोतकर साहेब, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे साहेब, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीताताई चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्याकडून बीड जिल्ह्याचा आढावा शिवसेना नेत्यांसमोर सादर करण्यात आला. यानंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकांबाबत विचार विनिमय, ध्येय धोरण ठरविण्यात आले. तसेच शिवसेना नेत्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांशी मुक्तसंवाद साधत सर्व समस्या जाणून घेत त्यांना आम्ही तुम्हाला ताकद देतो, तुम्ही संघटना मजबूत करा, सदस्य नोंदणीवर अधिक काम करा, स्थानिक स्वराज्य संस्थांवर भगवा फडकला पाहिजे. असा ठणठणीत आदेश मंत्री ना. उदय सामंत यांच्यासह शिवसेना नेत्यांनी पदाधिकाऱ्यांना देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले.

---

## बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अमर नाईकवाडे यांनी शहरातील विकास कामांची केली मागणी

### अजितदादांनी सदरील कामांना टप्प्याटप्प्याने मंजुरी देण्याचे आश्वासित केले

बीड । प्रतिनिधी

**राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा आज बीड शहरात दौरा झाला. या दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी त्यांचे स्वागत करत शहराच्या विविध विकासकामांसाठी महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन त्यांना सादर केले. यावेळी गटनेते फारुख पटेल, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, शेख निजाम, रामदास सरवदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.**

निवेदनात शहराच्या विकासासाठी पुढील महत्त्वपूर्ण मागण्या मांडण्यात आल्या. माँ वैष्णो पॅलेसजवळील एमआयडीसीच्या दोन एकर राखीव भूखंडावर उद्यान विकसित करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळील यशवंत (चमन) उद्यानासाठी भरीव निधी, नगरपरिषद, एमआयडीसी व कृषी उत्पन्न बाजार समितीकडे अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करून देणे, नाथापूर



रोड ते कुर्ला रोड (विश्वदत्त लॉन्स) हा रस्ता सिमेंट काँक्रीटचा करण्याची मागणी, खंडेश्वरी देवी मंदिराकडे जाणाऱ्या खिंड रस्त्याचे काँक्रीटीकरण, शहर बायपाससाठी शिदोड येथे सर्विस रस्ता तयार करून एमआयडीसीला थेट कनेक्टिव्हिटी देणे, एमआयडीसीतील सर्व रस्त्यांचे काँक्रीटीकरण, खंडेश्वरी मंदिरासमोरील तालुका क्रीडा संकुलात बॅडमिंटन हॉल, जिम हॉल, वॉकिंग ट्रॅक, संरक्षक भिंत आणि विद्युतीकरणासाठी निधी, शहरातील १७ प्रलंबित डीपी रस्त्यांना तातडीने मंजुरी, बिंदुसरा नदीकाठी संत सावता माळी मंदिरासमोर सुशोभीकरणासह वॉकिंग ट्रॅक विकसित करणे. या सर्व मागण्या शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असून, बीडच्या समृद्ध विकासासाठी या कामांना तातडीने मंजुरी देण्याची अपेक्षा शहराध्यक्ष अमर नाईकवाडे नाईकवाडे व त्यांच्या सहकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकत, संबंधित विभागांशी समन्वय साधून या कामांना टप्प्याटप्प्याने मंजुरी देण्याचे आश्वासन दिले. या दौऱ्यामुळे बीड शहरात विकासाला नवे गतीशील वळण मिळण्याची शक्यता आहे. अमर नाईकवाडे यांनी स्थानिक प्रश्नांचा मागोवा घेत सादर केलेले हे निवेदन शहरहितासाठी एक प्रभावी पाऊल ठरले आहे.

---

## शिवाजी महाराजांचा पुतळा उभारल्या प्रकरणी आ. कुचे यांच्यासह इतरांची निर्दोष मुक्तता

अंबड। प्रतिनिधी

अंबड शहरातील पाचोड नाक्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा विना परवानगी बसविल्याप्रकरणी नारायण कुचे यांच्यासह ४३ जणांविरूध्द अंबड पोलिस आ. ठाण्यात महाराष्ट्र राज्य पुतळा पवित्र अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात्रकरणी न्यायालयात खटला चालून उपलब्ध पुरावा, युक्तीवाद तसेच समोर आलेला पुरावा विश्वासार्ह नसल्याचे नमुद करीत न्यायालयाने आ. नारायण कुचे यांच्यासह ४३ जणांची या प्रकरणातून निर्दोष मुक्तता करण्याचे



आदेश दिले आहे. अंबड शहरातील पाचोड रोडवर १३ सप्टेंबर २०१९ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात आला होता. सदर पुतळा बसविणे बेकायदेशीर असल्याचे सांगत अंबड पोलिस ठाण्यात तत्कालीन पोलिस उपनिरीक्षक चाटे यांच्या फिर्यादीवरून आ. नारायण कुचे यांच्यासह ४३ जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास तत्कालीन सपोनि. बल्लया यांनी केला. याप्रकरणी पोलिसांनी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केल्यानंतर या प्रकरणाचा खटला सुरू झाला. न्यायालयाने या प्रकरणात एकुण सहा साक्षीदार तपासले. समोर आलेला पुरावा विश्वासार्ह नसल्याने आ. कुचे यांच्यासह सर्वांची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या खटल्यात आरोपींतर्फे ॲड. किशोर राऊत, ॲड. सय्यद वाकुब अली व ॲड. पाडमुख यांनी काम पाहिले.

---

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आज जिल्हा दौरा

जालना । प्रतिनिधी



**राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील सुधारित कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.**

आज शुक्रवार दि.८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता मत्स्योदरी मंगल कार्यालय अंबड येथे आगमन व महसूल सप्ताहाच्या जिल्हास्तरीय समारोप समारंभास उपस्थिती. दुपारी १.३० वाजता मोटारीने अंबडवरुन जालनाकडे प्रयाण. दुपारी २.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आगमन व नागरिकांची निवेदने स्विकारण्यासाठी राखीव. दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी यांच्या समवेत महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभाग, भुमि अभिलेख विभागाच्या आढावा बैठकीस उपस्थित राहतील. सायंकाळी ६.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेस उपस्थित राहतील. सायंकाळी ७ वाजता भाजपा कार्यालय जालना येथे राखीव. रात्री ८.३० वाजता मोटारीने जालनावरुन मोतिबाग राजूर मार्गे भोकरदनकडे प्रयाण करतील. रात्री ९.३० वाजता भोकरदन येथे आगमन व मुक्काम करतील.

---

## बीड ते मुंबई रेल्वे सुरू करण्याची रेल्वे समितीची पालकमंत्र्याकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

**अहिल्यानगर बीड परळी या रेल्वे मार्गाचे काम पूर्णत्वाकडे असून बीड पर्यंत काम पूर्ण झाले आहे तेव्हा बीड ते अहिल्यानगर व पुढे मुंबई ही रेल्वे सेवा सुरू करण्यात यावी या मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांना स्वातंत्र सैनिक रेल्वे आंदोलन समितीच्या वतीने देण्यात आले.**

स्वातंत्र्यसैनिक रेल्वे आंदोलन समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की बीड ते अहिल्यानगर रेल्वेचे काम पूर्ण झालेले असल्याने बीड ते मुंबई रेल्वे त्वरित सुरू करण्यात यावी तसेच बीड ते परळी रेल्वे मार्गाचे काम २०२५ पर्यंत पूर्ण करून ती पण रेल्वे परळी पासून मुंबई पर्यंत चालू करण्यात यावी धाराशिव बीड संभाजीनगर रेल्वेचे सर्वेक्षण झालेले आहेत त्यास मान्यता देऊन हा मार्गही लवकरात लवकर मार्गी लावावा हा रेल्वे मार्ग बीड जिल्ह्याच्या जनतेसाठी महत्त्वाचा असून आपल्यास मार्गदर्शनाखाली हे काम व्हावे अशी मागणी रेल्वे स्वातंत्र्यसैनिक रेल्वे आंदोलन समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा ज्येष्ठ सदस्य सत्यनारायणाची लाहोटी अशोक शेटे लाईक भाई शांतीलाल पटेल विष्णुदास बियाणे वाया जनार्दन राव सुरेश बुद्धदेव सुरेश नाना मेखे डॉक्टर अरुण भस्मे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### अजित दादा सकारात्मक

निवेदन स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सध्या बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणजेच १७ सप्टेंबर पर्यंत सुरू करण्याचा प्रयत्न राहील आणि पुढे मुंबईसाठी आपण प्रयत्न करू अशी आश्वासन स्वातंत्र्यसैनिक रेल्वे आंदोलन समितीला दिले.

---

## पान १ वरून...

### ऊसतोड मजुरांची ही

अनुदान देण्याची योजना आपण सुरू केली. मात्र एखाद्या कर्त्या व्यक्तीचा जीव गेल्यानंतर पाच लाखांची रक्कम ही अपुरी असल्यामुळे ती रकमेत दुप्पट म्हणजे १० लाख करावी अशी ही विनंती धनंजय मुंडे यांनी केली होती ती विनंती आपण मान्य केली असून याबाबतचा निर्णय लवकरच घेण्यात येईल असेही यावेळी बोलताना अजितदादा पवार म्हणाले. दरम्यान मिशन साथी योजनेच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांच्या गट (टोळी) मधील एका महिलेला याबाबतचे प्रशिक्षण व आरोग्य किट दिली जाणार असून अशा एक हजार किटचे वितरण आज करण्यात आले. मिशन साथी उपक्रमामुळे ऊसतोड कामगार महिलांच्या ऊस तोडणी हंगामामध्ये बाहेरगावी असताना आरोग्याची काळजी घेण्यास मदत होणार आहे, असेही ते म्हणाले. तसेच ऊसतोड मजुरांची ही शेवटची पिढी असावी यासाठी आम्ही प्रयत्न करणार असून जिल्ह्यात रोजगार कसा उपलब्ध होईल आणि कुशल मनुष्यबळ कसे तयार होईल यासाठी आम्ही काम करीत असल्याचेही अजित पवार म्हणाले. तसेच बीडच्या विमानतळाविषयी बोलताना ते म्हणाले, मी आजच केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांना बोललो असून विमानतळासाठी डीपीआरचे ४१ लाख रुपये विमान प्राधिकरणाला दिले असून लवकरच पुढील प्रक्रिया सुरु होणार असल्याचे पवार म्हणाले. शासनाने सीट्रीपलआयटीच्या माध्यमातून याठिकाणी कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे, यासाठी मदत होणार आहे. या केंद्रातून आगामी काही वर्षात दरवर्षी ७००० कुशल विद्यार्थी निर्माण होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील कौशल्यवर्धक तंत्रशिक्षण व व्यावसायाभिमूख रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टी सीट्रीपलआयटी प्रकल्प बीड जिल्ह्यात निर्माण करण्यात येत आहे. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वांनी पुढकार घ्यावा शासन निधी देईल, तो सत्कारणी लावावा, असेही ते म्हणाले.

**बीड जिल्ह्याला चांगले अधिकारी देणार**

बीड जिल्ह्याच्या बाबतीत काय बोलले जात होते हे सर्वांना माहित असून आता यापुढे जिल्ह्याची प्रतिमा चांगली झाली पाहिजे. त्यासाठी सध्या जिल्हाधिकारी, झेडपी सिईओ, एसपी हे तरुण दिले आहेत. यापुढे सुध्दा जिल्ह्याला चांगले अधिकारी देणार असून प्रत्येक अधिकाऱ्याने चांगले काम केले पाहिजे, असेही अजितदादा यावेळी म्हणाले.

-----------------

### केंद्राच्या योजनेतून बीड जिल्ह्यातील

ढाचा न बदलता सन २०२२-२३ पासून पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही योजना ग्रामविकास विभागाच्या निर्णयान्वये लागू केली आहे. सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेच्या निधीचे प्रमाण हे केंद्र हिस्सा ६०टक्के व राज्य हिस्सा ४०टक्के असे आहे. सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान योजनेसाठी वार्षिक कृती आराखड्यास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे.ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज सुलभ होण्यासाठी संसदीय समितीच्या सूचनांनुसार ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा घटकांतर्गत नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत आणि त्यासोबत नागरी सुविधा केंद्र खोली मंजूर करण्यासाठी पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील २८ ग्रामपंचायतींकरीता नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकाम व नागरी सुविधा केंद्र खोली बांधकामास मंजूर करण्यात आले आहे. यात केज तालुक्याला झुकते माप दिले असून २८ पैकी ४ इमारती या केज तालुक्यातील आहेत.

--------------

### बीड–लातूर शिक्षक भरती घोटाळा

कार्यालया अंतर्गत अनुदानित आणि अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता शालार्थ मान्यता सेवा सातत्य विनाअनुदानित वरून अनुदानित पदावर केलेली बदली यांची तपासणी करणे व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणे. विशेष चौकशी पथकाने उपरोक्त कार्य कक्षेमधील नमूद प्रकरणी सन २०१२ प्रकरणांचा तपास चौकशी करावीविशेष चौकशी पथकाने आपला अहवाल पथक गठीत झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत सादर करावा. अशा प्रकारचे आदेश राज्याचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी काढले आहेत.

-------------

### ट्रम्प टॅरिफनंतर सोने

१००५३३ रुपयांचा उच्चांक ओलांडला आहे. २४ कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचा दर १००६७२ रुपयांवर पोहोचला आहे. ६ ऑगस्टला दुपारी १२.३७ वाजता मल्टी कमोडिटी एक्सचेंजच्या अधिकृत वेबसाईटनुसार सोन्याचे दर १०१०८९ रुपये होते. तर, चांदीचा दर ११३४४५ रुपे होता. सर्राफा बाजारात सोन्याचे एका तोळ्याचे दर २४९३२ रुपयांनी वाढले तर चांदी २७५५९ रुपयांनी महागली आहे. ३१ डिसेंबर २०२४ ला सोन्याचे दर ७५७४० रुपयांवर होते. तर, चांदीचे दर ८६०१७ रुपये किलो होते.

------------

### श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा

वाढीव जागेसह विविध कामांच्या पूर्ततेसाठी वाढीव निधीची तरतूद करण्याबाबत विनंती करताच अजित दादांनी ती मान्य केली असून, आता आराखडा २६८.६८ कोटिंवरून ३५१ कोटी इतका वाढवण्यास मान्यता दिली असून, या कामाला गती व निधी मंजूर करता यावा यासाठी हे काम नियोजन विभागाकडे वर्ग करण्यासही अजित दादा पवार यांनी मान्यता दिली आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी अजित दादा पवार यांचे सर्व परळीकर व शिव भक्तांच्या वतीने आभार मानले, बैठकीस आ. विक्रम काळे, आ. नमिता मुंदडा, सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पालक सचिव श्री. वाघमारे, आर्किटेक्ट हेमंत पाटील, परळी नगर पालिकेचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, श्री. बेंडले, श्री. ढवळे यांसह आदी उपस्थित होते.

-------------

---

## विना अनुदानित शाळा कृती समितीने मानले उपमुख्यमंत्री अजित पवारांचे आभार!

बीड । प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा मंजूर केल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजित दादा पवार हे दोन दिवस बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे आणि बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी भेट घेऊन सर्वप्रथम त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर त्यांचे मनस्वी आभार मानले. शिवाय १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेशाचे अनुपालन करत लवकरात लवकर अनुदान वितरण करून सप्टेंबर मध्ये सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यात पगार जमा करावा अशी विनंती केली. यावेळी अजित दादा पवार यांनी हसून सरकार सकारात्मक असून बोलल्याप्रमाणे



सर्व शिक्षकांच्या खात्यात ऑगस्ट पेड सप्टेंबर पगार जमा होईल असे सांगितले. यावेळी शिक्षकांचे लाडके आ. विक्रम काळे आणि गेवराई विधानसभेचे आ. विजयसिंह पंडित उपस्थित होते.राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार हे ६ आणि ७ ऑगस्ट या दोन दिवसासाठी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. आज ७ ऑगस्ट रोजी अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदे दरम्यान शिक्षकांचे लाडके आमदार विक्रम काळे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे आणि बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी ना. अजित पवार यांची भेट घेतली. यावेळी शिक्षकांचे लाडके आ. विक्रम काळे, गेवराई विधानसभेचे आ. विजयसिंह पंडित आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर आदी उपस्थित होते.

---

## पान १ वरून...

### बीडमध्ये शिक्षकांच्या

दुसऱ्या शाळेवर किंवा पती-पत्नी एकत्रीकरण यासह अन्य बाबीसाठी शिक्षकांना ऑनलाईन अर्ज दाखल करण्याचे सांगितले आहे अशातच शिक्षक ऑनलाईन बदलीसाठी अर्ज दाखल करत असताना सकाळी ज्या पोर्टलवर अर्ज दाखल केला त्यावर दहावा क्रमांक असेल तर नेट बंद होताच पुन्हा हा क्रमांक तिसरीकडे जातो आणि ते शोधत बसावे लागते पोर्टल अद्यावत नसल्याने या सर्व भानगडी होतात आणि त्याचा फायदा कार्यालयातील कर्मचारी किंवा त्यातील तज्ञ घेत असल्याचे दिसून येत आहे जिल्हा परिषदेने या अडचणी दूर कराव्यात अन्यथा अनेक शिक्षकांवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

-----------

### लाडक्या बहिणींची

त्यांनी सांगितले. रक्षाबंधनाच्या अगोदर महिलांना १५०० रुपये त्यांच्या बँक खात्यावर जमा होणार असल्याचे त्या म्हणाल्या. लाडकी बहीण योजनेचा बोगसपणे लाभ घेणाऱ्यावर कारवाई करण्यात येत असून माहिती व तंत्रज्ञान विभागाने काही डाटा आमच्याकडे दिला आहे. या डेटाची तपासणी करण्यासाठी आम्हाला पुढच्या १५ दिवसांचा कालावधी लागणार आहे. त्यानुसार, पुढील १५ दिवसांत बोगस लाभार्थ्यांचा आकडा समोर येणार आहे. जर पुरुषांनी किंवा चुकीच्या व्यक्तीने याचा लाभ घेतला असल्याचे समोर आल्यास त्याच्यावर कडक कारवाई होणार असल्याचेही आदिती तटकरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. विशेष म्हणजे तटकरे यांनी ट्विटरवर पोस्ट करत लाडकी बहिण योजनेच्या हफ्त्यासंदर्भात माहिती दिली होती.

-----------------

### मुंडे पिता–पुत्राच्या प्रवेशाने

जिल्ह्याची बदनामी झाली तेवढी पुरे आता, यापुढे कोणीही कायदा हातात घेता कामा नये, जर कोणी चुकीचे काम केले तर त्याला माफी नाही. मग तो आमच्या पक्षाचा असला तरी त्याला सोडले जाणार नसल्याचे अजित पवारांनी स्पष्टपणे सांगितले. यावेळी मोठ्या संख्येने असलेला जनसमुदाय पाहून अजित पवारांनी मुंडे पिता-पुत्रांचे कौतुक केले. या प्रसंगी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. ८ ऑगस्ट २०२५



## थोडक्यात....

### पाटोद्यात गोचीड तापासह साथ रोगाचे थैमान

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात सध्या गोचीड ताप सह साथ रोगाचे थैमान असून लहान बालकासह नागरिक आजारी पडले असून प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुविधा भेटत नसल्याने खाजगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागत असून तालुका आरोग्य अधिकारी याकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून तरी याकडे पालकमंत्री नामदार अजितदादा पवार यांनी लक्ष देऊन तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राची चौकशी करावी अशी मागणी होत आहे याबाबत अधिक माहिती पाटोदा तालुका सध्या गोचीड ताप. टायफाईड. सह आदी साथरोगाची लागवण चालू असून ग्रामीण भागात असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर उपलब्ध होत नसून तर काही ठिकाणी औषध साठा नाही याकडे तालुका आरोग्य अधिकारी हे दुर्लक्ष करत असून यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना खाजगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागत असून यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचण सर्वसामान्य नागरिकाला होत आहे याकडे मात्र याकडे कोणीच लक्ष देत नसून तरी पालकमंत्री नामदार अजितदादा पवार यांनी लक्ष देऊन पाटोदा तालुक्यातील असणारे प्राथमिक आरोग्य केंद्राची चौकशी करून संबंधितावर वेळेवर हजर राहून तालुका अधिकारी यांची चौकशी करावी अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांतून होत आहे तर आज पालकमंत्री यांच्याकडे निवेदन देण्यात येणार आहे.

### इंदिराबाई हुगे यांचे निधन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी



येथील वीरशैव लिंगायत कोष्टी समाजाच्या जुन्या पिढीतील ज्येष्ठ महिला हैदराबाद बँकेशेजारी, मोंढा हालगे गल्ली येथील रहिवासी श्रीमती इंदिराबाई शंकरआप्पा हुगे (वय १०३) यांचे वृद्धापकाळाने (आज दि.६ ) रात्रीच्या सुमारास निधन झाले. पत्रकार संतोष जुजगर यांच्या त्या आजी होत. श्रीमती इंदिराबाई हुगे या अत्यंत कष्टाळू, संयमी व धार्मिक वृत्तीच्या महिला होत्या. त्यांचे संपूर्ण आयुष्य त्यांनी कुटुंबासाठी समर्पित केले. एक कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून त्या परिचित होत्या. संतोष व वामन या दोन नातवांवर त्यांचा विशेष स्नेह होता. हुगे व जुजगर परिवासाठी एक आधारवड असे आयुष्य त्यांनी घालवले. धार्मिक वृत्तीच्या इंदिराबाई यांची पवित्र श्रावणात वयाच्या १०३ व्या वर्षी प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनामुळे स्नेही,आप्तेष्ट व परिचितांमधून शोकसंवेदना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगी सौ. गंगाबाई विष्णू आप्पा जुजगर, नातू वामन व संतोष जुजगर, नातसुना, तीन पणतू, एक पणती असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने जुजगर परिवारावर कोसळलेल्या या दु: खात दै.राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

### टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी चाचणीचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी



सोलापूर जिल्ह्याच्या अकलुज येथे १९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या १७ वर्षांखालील राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी बीड जिल्हा संघ निवडण्यासाठी आष्टी येथे निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. ही निवड प्रक्रिया शनिवार दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता, आष्टी-जामखेड रस्त्यालगत हंबर्डे महाविद्यालय शेजारील तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर होणार आहे.या स्पर्धेचे उद्घाटन बीड जिल्हा टेनिस क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष तथा आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते होणार असून, या कार्यक्रमाला खेळाडूंसह क्रीडाप्रेमींची उपस्थित राहणार आहेत या निवड प्रक्रियेमध्ये केवळ १७ वर्षांखालील नव्हे तर १४ वर्षे वयोगट आणि १९ वर्षे वयोगट यांच्यासाठीही बीड जिल्हा संघ निवडला जाणार आहे. निवडलेले संघ बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये करतील.बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवा खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन बीड जिल्हा टेनिस क्रिकेट संघटनेचे सचिव सुशील तांबे, उपाध्यक्ष अविशांत कुमकर यांनी केले आहे.

## दोन लाख वृक्षांची लागवड

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये हरित अभियान राबविण्यात आले. या अंतर्गत परळी आणि अंबाजोगाई वनविभागाकडून दोन लाख मिश्र उपवनाची लागवड करण्यात आली. वसंतनगर येथील वनविभागाच्या जंगलात वृक्षलागवड अभियानाचा तहसीलदार व्यंकटेश मुंडे, वनक्षेत्र अधिकारी मनोहर पुंड यांच्या हस्ते लागवडीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी वसंतनगरचे सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, परळी वनपाल अनिल मालेवाल, वनरक्षक बाळासाहेब नागरगोजे, वनकर्मचारी, पत्रकार, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# शहराच्या वैभवात भर घालणारी कामे करा-अजित पवार

## अजित पवार यांच्याकडून विकास कामांची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरात सुरू असलेली विविध विकास कामे करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार काम करावी. बीडकरांच्या स्मरणात राहील तसेच शहराच्या वैभवात भर घालणारे काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.**

उपमुख्यमंत्री पवार यांनी आज सकाळी बीड शहरातील चंपावती क्रीडा मंडळ, कंकालेश्वर मंदिर, जिल्हा रुग्णालय, येथे सुरू असलेल्या व नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या विकास कामांची पाहणी केली. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार विजयसिंह पंडीत, माजी आमदार अमरसिंह पंडीत, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थित होते. कंकालेश्वर मंदिर येथे पाहणी करताना उपमुख्यमंत्री पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची माहिती घेतली.कंकालेश्वर देवस्थान हे बीड शहरासह जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. कंकालेश्वर देवस्थान परिसरात नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या विकास कामांमध्ये पारंपरिक व



आधुनिकतेचा संगम साधत बीडकरांना कायम स्मरणात राहील असे दर्जेदार कामे करावी. विकास काम करताना ती कामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार व टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे. भाविकांना सर्व सोयीसुविधा मिळतील अशा सर्व बाबींचा आराखड्यामध्ये समावेश करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या. पवार यांनी यावेळी कंकालेश्वर मंदिरात दर्शन घेतले. जिल्हा क्रीडा संकुलाची पाहणी करून उपस्थित नागरिकांशी उपमुख्यमंत्री पवार यांनी संवाद साधला. जिल्हा क्रीडा संकुलासाठी २४९९.९६ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकात विशेष बाब म्हणून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे. क्रीडा संकुलाच्या कामामुळे बीडकर नागरिकांना सुसज्ज क्रीडा संकुल उपलब्ध होणार आहे. यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, क्रीडा संकुलालगत असलेला संपूर्ण परिसर स्वच्छ करावा, या परिसरात कुठेही कचरा दिसणार नाही याबाबत नगरपालिका प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्हा रुग्णालय येथे सुरू असलेल्या कामाचीही उपमुख्यमंत्री पवार यांनी पाहणी केली. इमारतीची कामे करताना आगामी ५० वर्षांचा सर्वांगीण विचार केला पाहिजे, वीज, वाहनतळ, अग्निशामन यंत्रणा, सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्याधुनिक यंत्रणेचा वापर केला पाहिजे, इमारत पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना समाधान वाटले पाहिजे असे काम करा, असेही ते म्हणाले. यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज, डॉ आंबेडकर, आण्णाभाऊ यांचा वडवणीत पुतळा बसवा

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, व दीड दिवस शाळा शिकून जगभरामध्ये ज्यांचे साहित्य विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे असे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे या महापुरुषांचा पुतळा वडवणी शहरांमध्ये ज्या त्या चौकामध्ये बसवा असे निवेदन आझाद क्रांती सेनेच्या वतीने नगरपंचायतच्या मुख्य अधिकारी यांना देण्यात आले आहे.

सविस्तर वृत्त असे की, वडवणी शहरातील तमाम बहुजनांची अस्मिता असणारे छत्रपती शिवाजी महाराज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांचे पुतळे चौकात बसविण्यात यावे. हे क्रांतिकारी विचारवंत त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रेरणादायी ठेवा आजही नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरतो त्यांच्या विचारांनी समाज परिवर्तनाची दिशा ठरवली असून त्यांचा ठेवा खूप मोठा आहे. आमचे अस्मिता असणारा वडवणी शहरातील त्यांचे पुतळे बसवून त्यावर आपल्या मार्फत वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करून छत्रपती शिवाजी महाराज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे पुतळे वडवणी शहरांमध्ये चौकात बसवण्यात यावेत असे निवेदनाद्वारे आझाद क्रांती सेनेच्या वतीने कळवले आहे. यावेळी निवेदनावर



विलास कारके विधानसभा आझाद क्रांती सेना, महादेव आव्हाड वडवणी तालुका अध्यक्ष आझाद क्रांती सेना, अरुण आव्हाड कोर कमिटी सदस्य आझाद क्रांती सेना, लक्ष्मण आव्हाड ऊ का संघटना वडवणी तालुका अध्यक्ष आझाद क्रांती सेना, पिंटू आढागळे ऊसतोड कामगार संघटना वडवणी तालुका उपाध्यक्ष, जयदत्त आव्हाड युवा कार्यकर्ते आझाद क्रांती सेना, करण भिसे तालुकाध्यक्ष आजाद क्रांती सेना, मंगेश शिंदे तालुका महासचिव आझाद क्रांती सेना, व परमेश्वर उद्रे गायरान धारक प्रतिनिधी तालुका वडवणी यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

## योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तंत्रशिक्षणात महाराष्ट्रात अग्रेसर असणाऱ्या अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगच्या चि. बिराजदार अभिषेक या विद्यार्थ्याने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पॉलिटेक्निक पूर्ण केल्यानंतर, थेट द्वितीय वर्षास महाराष्ट्रात अग्रगण्य असणाऱ्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे () या नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळवला आहे. मराठवाड्यातून ऑटोमोबाईल विभागातून पॉलिटेक्निक अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सीओईपी येथे प्रवेश मिळवणारा चि. अभिषेक बिराजदार हा एकमेव विद्यार्थी आहे. त्याचबरोबर तृतीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या चि. भांगे ज्ञानेश्वर या विद्यार्थ्याने , , ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगच्या चि. दळवे परमेश्वर याने सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय,अंधेरी या शासकीय अभियांत्रिकी



महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळवला आहे. यापूर्वी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये चि. दळवे परमेश्वर व चि. बिराजदार अभिषेक या विद्यार्थ्यांनी तृतीय वर्षात, तसेच प्रथम वर्षात शिकणाऱ्या २० विद्यार्थ्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण संपादित करून, महाराष्ट्रात सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे..विद्यार्थ्यांच्या या यशामुळे योगेश्वरी पॉलिटेक्निक तंत्रशिक्षणात महाराष्ट्रात अग्रेसर असल्याचे सिद्ध झाले आहे.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### वृक्ष लागवडीसाठी सर्वांचे

दिल्याचे त्यांनी सांगितले. जुनी आठवण करून देतानाच सामंत म्हणाले की मनोहर जोशी साहेब मुख्यमंत्री असताना त्यांच्या काळात या क्रीडा संकुलाला छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल असे नाव द्यावे याचा संकल्प केलेला होता. ही घोषणा अजित दादांनी पूर्ण करून महाराजांचा सन्मान करावा आणि आदरणीय मनोहर जोशी यांना आदरांजली द्यावी अशी मागणी केली. बीडमध्ये चौथे ट्रेनिंग सेंटर होत असून पाचवे नांदेडमध्ये होणार असल्याचेही उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. याचवेळी त्यांनी बीड येथील नाट्यगृहासाठी निधी द्यावा अशी मागणी ही अजित दादा यांच्याकडे केली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. यावेळी कार्यकारी अधिकारी जतीन यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी इंडिया बुक ऑफ रेकॉर्डचे प्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमाला नागरिक ,अधिकारी कर्मचारी, विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घरफोड्या करणाऱ्या

असता त्याने सांगितले की सदरची तार व टायर हे चोरीचे आहे असे सांगितले. मी व माझे सोबत ईतर ०५ साथिदारांनी मिळुन माझे ताब्यातील पिक उप वाहनाने केज येथुन तीन वेळा विद्युत तार व एक वेळा मस्साजोग येथील बिअरबार फोडुन दारु चोरी केली आहे. तसेच युसुफवडगाव येथुन टायर चोरी केली आहे असे सांगितले.

यावरुन पोलीस ठाणे केज व युसुफ वडगाव हद्दीत सदर आरोपी व त्याचे साथीदाराने एकुण ०३ अॅल्युमिनीअम तार चोरीचे, ०१ बिअरबार व ०१ टायरचोरीचे खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहेत.

आरोपीचे ताब्यातुन गुन्हयात वापरलेंले पिक अप वाहन, १२५ किलो अॅल्युमिनीअम तार, चार टायर डिक्स सह व एक कटर असा एकुण ५,३२,५००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कामगीरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत ,अपर पोलीस अधिक्षक अंबाजोगाई चेतना तिडके, पो. नि. शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोहवा महेश जोगदंड/१२४९, पोहवा जफर पठाण /२०९१, पोअं बप्पासाहेब घोडके/६५०, चापोहवा गणेश मराडे/११८५ स्था.गु.शा बीड यांनी केली आहे

### १५ ऑगस्ट डिजिटल इंडिया

त्यांनी आपल्या पत्रात भारताच्या इंटरनेट प्रवासातील काही महत्त्वाचे टप्पे अधोरेखित केले आहेत: १९८६ शिक्षण व संशोधन संस्थांसाठी इंटरनेट सेवा, १९८७ जिल्हास्तरावर शासन व नियोजन संस्थांना कनेक्टव्हिटि, १९९५ सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू, १९९८ खासगी इंटरनेट कंपन्यांसाठी दरवाजे खुले, २००५ ई-कॉमर्स, टेलिमेडिसिन, ऑनलाईन शिक्षणासाठी गती, २०१६ स्वस्त मोबाइल डेटा, युपीआय आधार या प्रणालींची निर्मिती, २०२५ तंत्रज्ञानात जागतिक नेतृत्वाची दिशा देण्याचे काम झाले आहे. आज भारताचा तरुण आयटी निर्यात, स्टार्टअप्स आणि डिजिटलीकरणाच्या बाबतीत तो जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करत आहे. डिजिटल वाटचाल बाजारपेठेच्या उद्देशाने नव्हे तर सार्वजनिक हित लक्षात घेऊन सुरू झाली होती, आणि आज ती भारताला तंत्रज्ञानाच्या आघाडीवर घेऊन गेली आहे, असेही म्हटले आहे.

### आपली आष्टी

करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.''

या कार्यक्रमास आष्टी तहसीलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार तथा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बाळदत्त मोरे, आष्टी नगराध्यक्ष जिया बेग,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, पाटोदा भाजपा तालुकाध्यक्ष भागवत येवले शिरूर कासार भाजपा तालुका अध्यक्ष सुरेश उगलमुगले उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,नगरसेवक अरुण भैय्या निकाळजे, गटनेते तथा नगरसेवक किशोर झरेकर, नगरसेवक भारत मुरकुटे, नगरसेवक शरीफ शेख, नगरसेवक सुरेश वारंगुळे, नगरसेवक इर्शान खान, नगरसेवक सुनील रेडेकर, नगरसेवक बाळासाहेब घोडके, बाबू कदम, संजय मुळे,शाम वाल्हेकर, इंजि.गहीनाथ शिरसाठ,इंजि.अथहर बेग,लेखपाल साठे यांच्यासह शासकीय अधिकारी-कर्मचारी, पर्यावरणप्रेमी नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवून साजरा केला वाढदिवस

### तिंतरवणीत मुंडे, धोंडेच्या वाढदिवसानिमित्त महारुद्र खेडकर यांचा स्तुत्य उपक्रम



फुलसांगवी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण वातावरण बदल तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे व व माजी आ.भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजप कार्यकर्ता महारुद्र खेडकर यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व वाटप करून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरती हास्य फुलवून आपल्या नेत्याचा वाढदिवस साजरा केला.

शिरूर कासार तालुक्यातील तिंतरवणी येथील रहिवासी असलेले महारुद्र खेडकर हे राजकारणाला सामाजिक कार्याची जोड लावून राजकीय तथा सामाजिक कार्यामध्ये मोठे सक्रिय झालेले आहेत. भाजपा नेत्या तथा महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे व व आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी आ.भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक कार्यामध्ये वाहून घेत आहे.तिंतरवणी परिसरातील गोर गरीब जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी सदैव कटीबद्ध असतात. मंत्री पंकजा मुंडे व माजीआ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महारुद्र खेडकर यांनी प्रतिवर्षाप्रमाणे याही याही वर्षी मातोरी गटातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्यासह खाऊ वाटप करून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले आहे. बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी तिंतरवणी येथील संत वामनभाऊ विद्यालयामध्ये मुख्याध्यापक रमेश सानप यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची वाटप केली आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून हभप.महंत बालाजी महाराज शेवाळे, गोरख तात्या खेडकर, शंकर भालेकर, दिगंबर गायकवाड आदी मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमा संत वामनभाऊ विद्यालयातील अशोक सानप सर, एस.के. खेडकर सर, ए.जी. ढाकणे सर, बाळासाहेब सानप सर, कुंडलिक नागरगोजे सर, एस.एस. गीते सर, मधुकर कापरे सतीश खरमाटे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले होते. या कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अशोक सानप सर यांनी केले होते.

## भारतीय जनता पार्टीच्या बीड शहर उपाध्यक्षपदी प्रकाश आणेराव यांची निवड



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा लोहार गाडी लोहार समाज विकास संघाचे जिल्हाध्यक्ष श्री. प्रकाश आणेराव यांची भारतीय जनता पार्टीच्या बीड शहर उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की बीड जिल्हा लोहार गाडी लोहार समाज विकास संघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश आणेराव गेल्या वीस वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. त्यांनी त्यांच्या माध्यमातून अनेक समाज उपयोगी कामे केली आहेत. समाज बांधवांना ओबीसी प्रवर्गातून एन टी प्रवर्गात समावेश करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न असतील त्याचबरोबर पीएम विश्वकर्मा योजना बीड जिल्हाचा समावेश करण्यासाठी केलेले प्रयत्न तसेच गोरगरीब जनतेसाठी असणारी त्यांची तळमळ बघून जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा पर्यावरण मंत्री मा. पंकजाताई मुंडे, मा.खा. प्रीतम ताई मुंडे यांच्या आदेशाने भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख तसेच जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले बीड शहराध्यक्ष अशोकजी लोढा, नवनाथ अण्णा शिराळे,सलीम जहांगीर,अजय सवई, ॲड.संगीताताई धसे,परदेशी मॅडम, चंद्रकांत मुळे व भाजपाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत श्री.प्रकाश आनेराव यांची भाजपाच्या बीड शहर उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली व सर्वांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले.

या निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना श्री. प्रकाश आणेराव म्हणाले की,पर्यावरण मंत्री माननीय पंकजाताई मुंडे तसेच माजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांचे हात बळकट करण्यासाठी व पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोच करण्यासाठी आपण अहोरात्र प्रयत्न करणार आहोत. तसेच गोरगरीब जनतेसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळापर्यंत कसा पोहच करता येईल यासाठी देखील आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे दिनेश मोंढेकर, पियुष आणेराव, रमेश राज उपळकर,गणेश आनेराव,शेख अब्दुल रहमान,सुरेश डोंगरे मिस्तरी,ज्ञानेश्वर आणेराव,जालिंदर अंकुशे,बापू आणेराव, सुनील देशमुख, यांच्यासह सर्व स्तरातून मित्र परिवाराकडून अभिनंदन होत आहे.

## आदर्श शिक्षक भागवत मसने लोकशाहीर अण्णाभाऊ राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**आदर्श शिक्षक व उत्कृष्ठ संवादक, वक्ता असलेले बीड जिल्ह्यातील भागवत रामकृष्ण मसने यांना मानवतावादी संस्कृतिक चळवळ आणि धम्म भवन चारिटेबल ट्रस्ट कोल्हापूर यांच्यातीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. रविवार दि ३ ऑगस्ट रोजी कोल्हापूर येथील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे राज्याचे माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शानदार सोहळ्यात पुरस्काराचे वितरण करण्यात आले.यावेळी आमदार राजीव आवळे, उत्तम दादा कांबळे (जिल्हाध्यक्ष,आर.पी.आय. रामदास आठवले गट कोल्हापूर) , तसेच समितीच्या प्रमुख अंकिता कोल्हापूरकर , प्राध्यापक कुराडे, डॉक्टर श्रीपाद देसाई, ऍड करुणा विमल हे प्रामुख्याने उपस्थित होते. लोकशाहीर अण्णाभाऊ सन्मान चिन्ह , लोकराजा राजर्षी शाहू महाराज सन्मानचिन्ह व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील पुस्तक देऊन मसने सन्मानित करण्यात आले.**

मानवतावादी सांस्कृतिक चळवळ धम्म भवन चॅरिटेबल ट्रस्ट कोल्हापूर, यांच्यावतीने कला साहित्य, संस्कृती, शिक्षण, आरोग्य, राजकारण, समाजकारण, आणि विविध जनसेवेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांना लोकशाहीर अण्णाभाऊ राष्ट्रीय सन्मान पुरस्कार देऊन



*शाहू नगरीत मोठ्या उत्साहात रंगला सन्मान सोहळा*

मान्यवरांच्या हस्ते दरवर्षी सन्मानित केले जाते. त्या अनुषंगाने मे व जून महिन्यात असे कार्य करणाऱ्यांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या दृष्टीने कला,साहित्य, शिक्षण व राजकारणावरील वात्रटिका व सांस्कृतिक क्षेत्रात आज पर्यंत भागवत मसने सहशिक्षक श्री योगेश्वरी नूतन विद्यालय यांनी जे कार्य केले त्याचे सर्व पत्र, स्वलिखित पथनाट्याचे व्हिडिओ, स्वलिखित गाण्याचे व्हिडिओ, तसेच अनेक कवी संमेलनाचे व्हिडिओ सूत्र संचालनाच्या क्लिप आदी दस्तऐवज यासाठी पाठवले होते. त्यांनी पाठवलेल्या साहित्याची दखल व त्यांच्या सर्व कार्याची दखल घेऊन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार २०२५ भागवत मसने यांना जाहीर करण्यात आला. या पुरस्काराचे वितरण येत्या ३ऑगस्ट २०२५ रोजी राजर्षी शाहू स्मारक भवन कोल्हापूर येथे करण्यात आले. मसने सरांनी यापूर्वीही महाविद्यालयीन जीवनापासूनच वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेत सहभागी होवून अनेक जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धेत पारितोषिके मिळविली आहेत. मराठवाडा विभागीय स्तरावरील स्पर्धेतील पहिले बक्षीस ३० डिसेंबर १९८९ साली खोलेश्वर महाविद्यालयात बारावी मध्ये शिक्षक असताना के. के. एम. कॉलेज मानवत मध्ये पटकविले त्यानंतर पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेत अनेक स्पर्धा गाजविल्या आहेत. स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातून नाट्यशास्त्र विषयातील पदवीचे शिक्षण घेत असतांना वाद विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धामध्ये व्यक्तिगत ३२ हून अधिक बक्षीसे मिळवली आहेत. तर सांघिक बक्षिसांच्या ढाली स्वामी रामानंद महाविद्यालयाला प्राप्त करून दिल्या आहेत. तासिका तत्त्वावर श्री. योगेश्वरी महाविद्यालयामध्ये वरिष्ठ स्तरावर प्राध्यापक म्हणून काम करीत असतांना सात वर्षात अनेक विद्यार्थी वक्तृत्व वादविवाद स्पर्धेत घडवले. त्यानंतर नोव्हेंबर २००२ मध्ये श्री. योगेश्वरी नूतन विद्यालय या ठिकाणी रुजू झाल्यानंतर अनेक विद्यार्थी घडविण्याबरोबरच पाच एकांकिका व पाच गीते लिहून विद्यालयाच्या विद्यार्थी चमूद्वारे बीड आकाशवाणी केंद्रीवर सादर केल्या आहेत. तसेच अनेक वर्षापासून एक ते दीड तासाचा हास्य व्यंगात्मक कार्यक्रम अनेक महाविद्यालयामध्ये सादर केला आहे.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६

E-Mail ID: tahsildarambad gmail.com"

जा. क्र.२०२५/सेतु/कावि-६७ दिनांक-२७/०७/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती गणेश प्रल्हाद पवार रा. राहुवाडी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या आजोबा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सखाराम मानु पूवार | आजोबा | २४/०३/२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २७/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

cmyk




# सोलापुरातील कारखानदारांनी शेतकऱ्यांचे ८२ कोटी रुपये थकवले

राज्यातील अनेक साखर कारखान्यांकडे शेतकऱ्यांच्या ऊसाची एफआरपी थकीत आहे. सोलापूर जिल्ह्यात देखील आठ साखर कारखान्यांनी मागील वर्षीच्या गळीत हंगामातील शेतकऱ्यांच्या ऊसाची बिले दिली नसल्याची माहिती रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुहास पाटील एबीपी माझाशी बोलताना दिली. सोलापूर जिल्ह्यातील कोणत्या साखर कारखान्यांकडे किती एफआरपी थकीत आहे, याबाबतची सविस्तर माहिती पाहुयात. सोलापूर जिल्ह्यातील मागील वर्षातील ऊस गाळप हंगामातील शेतकऱ्यांची ऊस बिले आठ साखर कारखान्यांनी अद्यापही दिलेले नाहीत. अशा साखर कारखान्यांवर आरसी कारवाई केली. परंतु त्याला साखर कारखान्याने आजपर्यंत जुमानले नाही. म्हणूनच गेल्या २२ जुलैला मंत्रालयातील ऊस नियंत्रण मंडळाच्या बैठकीत अशा साखर कारखान्यांवर संचालक मंडळ व कार्यकारी संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याविषयी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सकारात्मक चर्चा झाली असल्याचे ऊस नियंत्रण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा रयत क्रांती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुहास पाटील यांनी सांगितले.

या वरील साखर कारखान्यांकडे शेतकऱ्यांच्या ऊसाची थकीत एफआरपी आहे. सोलापूर



जिल्ह्यातील आठ कारखानदारांनी शेतकऱ्यांचे मागील हंगामातील जवळजवळ ८२ कोटी ५० लाख रुपये थकवले आहेत. शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात, कारखानदारांकडून फसवणूक पुढील गाळप हंगामाची तयारी या सर्व साखर कारखान्यांनी रोलर मशीनची पूजा केल्याचे दिसून येते. साखर आयुक्तालयाने या कारखान्यांवर आरसीची कारवाई करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. परंतू, जिल्हाधिकाऱ्यांकडून संबंधित साखर कारखान्यांवर आरआरसी कारवाई करण्यास विलंब लावत आहेत. कारखान्यांचे मालमत्ता जप्तीची कारवाईचे शिफारस केलेले आहे. सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडलेला आहे. यातील काही साखर कारखान्यांनी एफआरपी पेक्षा कमी पहिला हप्ता पंधराशे रुपयांनी शेतकऱ्यांना दिलेला आहे. म्हणजे साखर कारखानदारांनी शेतकऱ्यांना फसवले आहे.

सोलापुरातील कारखानदारांनी शेतकऱ्यांचे ८२ कोटी रुपये थकवले, फौजदारी कारवाई करण्याची मागणी, कोणाकडे किती थकबाकी? एफआरपी ची रक्कम १४ दिवसांच्या आत देण्याचा नियम ऊस नियंत्रण कायदा १९६६ नुसार पुरवठादाराला एफआरपी ची रक्कम १४ दिवसांच्या आत देण्याचा नियम आहे. अन्यथा १५ टक्के व्याजदराने नुकसान भरपाई शेतकऱ्यांना द्यावी. असा आदेश असताना कोणताही साखर कारखाना या आदेशाची अंमलबजावणी करताना दिसत नाही. एफआरपीची रक्कम न देणाऱ्या साखर कारखान्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा : सुहास पाटील

पुढील वर्षी ऊसाचा गाळप हंगाम ऊस लागवडीचे क्षेत्र वाढल्यामुळं मोठा असणार आहे. त्यातच बरीच भर साखर कारखाने उसाची बिले देतील का नाही याबाबतचे शंका सर्व शेतकऱ्यांमधून निर्माण होत आहे, सर्व शेतकरी संभ्रमावस्थेत आहेत. म्हणूनच एफआरपीची रक्कम न देणाऱ्या साखर कारखान्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याविषयीची कारवाई साखर आयुक्तांनी लवकरात लवकर घ्यावी असे आवाहन आहे ऊसदर नियंत्रण समितीचे सदस्य प्रा सुहास पाटील यांनी केले.

खोटी कागदपत्रे तयार करुन साखर आयुक्तालयाकडून आरआरसीची कारवाई रद्द साखर आयुक्तालयाचा अंकुश ऊस कारखान्यांवर राहिलेला दिसत नाही. विभागवार प्रादेशिक सहसंचालक कार्यालय असून नसून कोळंबा अशा अवस्थेत आहेत. कारखानदार व प्रादेशिक सहसंचालक यांचे मिलीभगत असून ऊसाची एफआरपी शेतकऱ्यांना दिलेली आहे.अशी खोटी कागदपत्रे तयार करून साखर आयुक्तालयाकडून आरआरसी ची कारवाई रद्द केली जाते. सोलापूर जिल्ह्यातील भैरवनाथ शुगर वर्क्स आलेगाव व भैरवनाथ शुगर वर्क्स लवंगी या दोन साखर कारखान्यांनी बनावट कागदपत्रे दाखवून आरआरसी कारवाई रद्द करून घेतली. याविषयी साखर आयुक्तांनी कारखान्याच्या संचालकांवर व प्रादेशिक सहसंचालक, ऑडिटर यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला नाही तर मी न्यायालयात याविरुद्ध दाद मागणार असल्याचे मत सुहास पाटील यांनी व्यक्त केले.

## जनावरातील पोटाच्या आजारावर घरगुती उपाय



पावसाळा सुरू झाला की या काळात जनावरांना वेगवेगळे आजार होतात. विशेषतः पोटाशी संबंधित समस्या जास्त प्रमाणात आढळून येतात. जनावरांना पोटफुगी, अतिसार आणि इतर पोटाच्या विकारावर घरगुती उपाय चांगले फायद्याचे ठरतात. सौम्य पोटफुगी : पोटफुगी झाल्यावर जनावर जास्त प्रमाणात खात पीत नाही, सुस्त पडतात. जनावरांच्या पोटाचा आकार विशेषतः डाव्या बाजूचा जास्त प्रमाणात वाढतो. श्वासोच्छावासास त्रास होतो. घरगुती उपाय – ५० ग्रॅम आले, १ पूर्ण लसूण, ३ वेलची, ५ ते ६ लवंगा, हे सर्व अर्धा लिटर पाण्यात उकळून त्यात थोडासा गूळ टाकून काढा तयार करा. दिवसातून एकदा २ दिवस हा काढा जनावरांना द्या. काढा दररोज ताजा तयार करा. वासरांना काढ्याची अर्धी मात्रा द्यावी.

अतिसार : दूषित पाणी पिल्यामुळे हा आजार होतो. यामुळे जनावरांना पाण्यासारखे पातळ जुलाब होते. अशक्तपणा येतो. घरगुती उपाय – मूठभर चहाची पाने एक लिटर पाण्यामध्ये उकळवा. गाळून त्यात अर्धा मूठ आले घाला. हे द्रावण दिवसातून दोनदा ३ ते ४ दिवस भिजवा. दररोज नवीन तयार करा. पेरूची ताजी पाने अर्धा किलो पाने तीन ग्लास पाण्यात उकळून घ्या. या द्रावणाने जनावरांना दिवसातून दोनदा भिजवून काढा. १ लिटर पाण्यात पोटॅशियम परमँगनेटचे ५ ते १० खडे मिसळा. या द्रावणाने जनावरांना दिवसातून दोनदा भिजवून काढा. इतर पोटाचे विकारावर घरगुती उपाय : आल्याचा रस ५०० मिली, शेवग्याच्या पानांचा रस ५०० मिली, मध २०० मिली. हे सर्व एकत्र मिसळून २ दिवस दिवसातून दोनदा द्या. सूचना – जनावरात आजाराचे प्रमाण वाढल्यास त्यांना त्वरित पशुवैद्यकाकडे घेऊन जा आणि योग्य उपचार करा.

## शिळ्या अन्नापासून बायोगॅस निर्मिती; वाया जाणाऱ्या अन्नासाठी उत्तम पर्याय

आपल्या कृषिप्रधान देशात जेवढे जास्त प्रमाणात अन्नधान्य उत्पादन केले जाते, तसेच हे अन्नधान्य वाया जाण्याचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. विशेषतः शिजवलेले अन्न. रोजचे अन्न असो की मोठमोठे लग्न समारंभ किंवा कार्यक्रमात भरपूर अन्न उरते किंवा नासते. असे अन्न मग कोणाला देण्यात येते किंवा नासले असेल तर फेकण्यात जाते. परंतु जर आम्ही तुम्हाला सांगीतले की या शिळ्या अन्नापासून बायोगॅस निर्मिती करता येते.

चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी येथील कन्यकामाता मंदिरात अनेकांकडून भोजनदान दिले जाते. मात्र तयार केलेले हे अन्न खुपदा मोठ्या प्रमाणात शिल्लक राहते. यावर उपाय म्हणून येथील मंदिर समितीने मंदिर सभागृहाच्या बाजूलाच बायोगॅस प्रकल्प तयार केला आहे. आता याच बायोगॅसच्या माध्यमातून भोजन तयार केले जाते. शिवाय सभागृहात राहणार्या इतरही कर्मचार्यांना याचा लाभ होऊ लागला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी येथील कन्यकामाता मंदिर सभागृहात दरवर्षीच मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाचे आयोजन होत असते. मंदिर सभागृह परिसरात मोकळी जागा असल्यामुळे जनावरांचा वावर दिसून येत असतो. दरम्यान, कार्यक्रमातील अनावश्यक आणि नाशवंत अन्न बाहेर फेकल्यांनतर मोकाट गुरांनी ते खाल्ले तर त्यांना विषबाधा होण्याची शक्यता असते. म्हणून मंदिर प्रशासनाने शिळ्या अन्नापासून बायोगॅस निर्मिती करण्यास सुरवात केली आहे. या सभागृहात अनेक कार्यक्रम पार पडतात; मात्र हे कार्यक्रम संपन्न




झाल्यावर जेवणावळीनंतर शिल्लक अन्नाची विल्हेवाट आता बायोगॅसच्या माध्यमातून लावली जात आहे. शिळ्या अन्नापासून जनावरांना विषबाधा होऊ नये. सभागृह परिसरात दुर्गंधी पसरू नये, नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पाच वर्षापासून बायोगॅसचा वापर सुरू आहे. सभागृहात काम करणारे कर्मचारी व पुजारी बायोगॅसचा वापर करून स्वयंपाक बनवतात. आपल्या देशात लग्नसमारंभ आणि विविध कार्यक्रमात जेवणाच्या पंगतीत भरपूर अन्न उरते . त्यामुळे या पद्धतीचा वापर केल्यास अन्न वाया तर जाणार नाहीच शिवाय परिसर सुद्धा स्वच्छ राहील. त्यामुळे प्रत्येक गावात आणि शहरात या पर्यायाचा अवलंब करण्याचा विचार करण्यास हरकत नाही.

# खरीपातील पिकांचे आणि फळझाडांचे नियोजन; जाणून घ्या कृषी तज्ज्ञांची माहिती

सध्या खरीप पिकांची पेरणी पूर्ण झालेली आहे तर काही ठिकाणी ती सुरु आहे. वेगवेगळ्या खरीप व फळ पिकात आंतर मशागतीची कामे, कीड आणि रोग नियंत्रण फवारणी, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर व इतर कामे सुरु आहेत. कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी पिकांच्या वेगवेगळ्या अवस्थेत काय काळजी घ्यावी याबद्दल शिफारस केलेली आहे.

खरीप पिकाचे नियोजन : कापूस पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा ॲसिटामॅप्रिड २० % २ ग्रॅम प्रति १० लिटर किंवा फलोनिकॅमिड ५०% ६० ग्रॅम प्रति एकर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. कापूस पिकाची लागवड करून एक महिना झाला असल्यास कोरडवाहू कापसाला ३१ किलो नत्र प्रति हेक्टरी तर बागायती कापसाला ५२ किलो नत्र प्रति हेक्टरी वरखताची मात्रा द्यावी. कापूस पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. कापूस पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. सुक्ष्म अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे तूर पिक पिवळे दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ईडीटीए चिलेटेड मिक्स मायक्रोन्यूट्रिएंट ग्रेड-२ ५० ग्रॅम किंवा ५० मिली + १९:१९:१९ खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. तूर पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. तूर पिकात पाणी साचून राहणार



नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मूग/उडीद पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मूग/उडीद पिकात मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची पावसाची उघड बघून फवारणी करावी. उडीद पिकात करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. खोड माशीच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ ईसी किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ एसएल १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. भुईमुग पिकात जमिनीत वापसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मका पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील कीटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असताना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी. मका पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

फळबागेचे व्यवस्थापन : केळी बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. केळी बागेतील रोगग्रस्त पाने काढून टाकावीत. केळी बागेस ५० ग्रॅम यूरिया प्रति झाड खतमात्रा द्यावी. केळी बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. आंबा बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

रस शोषण करणाऱ्या किडींच्या व्यवस्थापनासाठी इमिडाक्लोप्रिड ४ ते ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. द्राक्ष बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. रोगग्रस्त पानाची विरळणी करून घ्यावी. द्राक्ष बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. सिताफळ बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. सिताफळ बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी.




### जागतिक दिवस: भारत छोडो दिवस, भारतीय ग्रंथालय दिन आंतरराष्ट्रीय भूमिपूत्र दिन

### महत्वाच्या घटना

११७३ : पिसाच्या मनोर्याचे बांधकाम सुरू झाले. हा मनोरा बांधण्यास २०० वर्षे लागली आणि चुकीने तो तिरका बांधला गेला.
१८९२ : थॉमस एडिसन यांना दुहेरी तार यंत्राचे पटेंट मिळाले.
१९२५ : चंद्रशेखर आझाद आणि त्यांच्या सहकार्यांनी काकोरी रेल्वेस्थानकावर सरकारी खजिना लुटला.
१९४२ : 'चले जाव' चा नारा दिल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
१९४५ : अमेरिकेने जपानच्या नागासाकी शहरावर 'फॅटबॉय' हा अणूबॉम्ब टाकला. यात ३९,००० लोक तत्क्षणी म्रुत्यूमुखी पडले तर हजारो लोकांना पुढील अनेक वर्षे किरणोत्सर्गाचे परिणाम भोगावे लागले. प्रथम हिरोशिमा व नंतर नागासाकी या शहरांवर टाकलेल्या अणूबॉम्बमुळे जपानने शरणागती पत्करली आणि दुसरे महायुद्ध संपुष्टात आले.
१९६५ : मलेशियातुन बाहेर काढल्यामुळे सिंगापूर हा देश स्वतंत्र झाला. आपल्या इच्छेविरुद्ध स्वतंत्र झालेला हा जगातील एकमेव देश आहे.
१९७४ : वॉटरगेट प्रकरण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी राजीनामा दिला.
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९७५ : पंतप्रधानांच्या विरुध्द कोर्टात जाण्यास मनाई करणारे विधेयक संसदेत मंजूर करण्यात आले. या वेळी बरेच विरोधी पक्षनेते तुरुंगात होते.
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९९६ : पद्मभूषण व पद्मश्री पुरस्कार तसचं, भारतरत्न पुरस्कार सन्मानित जगप्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर यांची भारतीय क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी नियुक्ती करण्यात आली.
२००० : भाभा अणूसंशोधन केन्द्राचे संचालक डॉ. अनिल काकोडकर यांना दिल्ली येथील 'इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रियल रिसर्च' या संस्थेचा सुवर्णमहोत्सवी गौरव पुरस्कार जाहीर
२००५ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाचे डिस्कव्हरी हे मानवरहित अंतराळ यान चौदा दिवसांच्या साहसी आणि धोकादायक प्रवासानंतर कॅलिफोर्नियास्थित एअरबेसवर सुरक्षितपणे उतरले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६३१ : इंग्लंड देशांतील पहिले कवी पुरस्कार विजेते इंग्रज कवी, साहित्यिक समीक्षक, अनुवादक आणि नाटककार जॉन ड्राइडन यांचा जन्मदिन.
१७५४ : पिअर चार्ल्स एल्फांट वॉशिंग्टन शहराचे रचनाकार फ्रेन्च अमेरिकन वास्तुविशारद आणि स्थापत्य अभियंता (मृत्यू: १४ जून १८२५)
१७७६ : ॲमेडीओ ॲव्होगॅड्रो इटालियन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ९ जुलै १८५६)
१८७६ : ब्रिटीश कालीन भारतातील बंगाल प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड लिटन द्वितीय ( –, २) यांचा जन्मदिन.
१८९० : 'संगीतसूर्य' केशवराव भोसले 'संगीत सौभद्र' मधील धैर्यधराच्या भूमिकेत गाजलेले गायक अभिनेते. 'हाच मुलाचा बाप', 'सन्याशाच्या मुलगा' या नाटकांतील त्यांच्या भूमिका गाजल्या. त्यांनी स्थापन केलेल्या ललितकलादर्श संगीत नाटक मंडळींतर्फे 'सौभद्र', 'शारदा', 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' इ. अनेक नाटके रंगभूमीवर आली. (मृत्यू: ४ आक्टोबर १९२१)
१८९१ : सयुक्त प्रांताचे माजी राज्यपाल फ्रान्सिस वर्नर वाईली यांचा जन्मदिन.
१८९३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय हिंदी कादंबरीकार, संपादक आणि गद्य लेखक शिवपूजन सहाय यांचा जन्मदिन.
१९०९ : डॉ. विनायक कृष्ण गोकाक ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कन्नड साहित्यिक, शिक्षणतज्ञ व इंग्रजी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक (मृत्यू: २८ एप्रिल १९९२)
१९२० : कृ. ब. निकुम्ब 'घाल घाल पिंगा वार्या, माझ्या परसात' या कवितेमुळे परिचित असलेले भावकवी. त्यांचे अनेक कवितासंग्रह व 'सायसाखर' हे खंडकाव्य प्रसिद्ध आहे. (मृत्यू:)
१९३३ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय हिंदी लेखक, पत्रकार आणि पटकथा लेखक व कादंबरीकार मनोहर श्याम जोशी यांचा जन्मदिन.
१९३७ : मॉरिशस येथील पसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार अभिमन्यू अनंत यांचा जन्मदिन.
१९७५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते महेश बाबू यांचा जन्म.
१९९१ : हंसिका मोटवानी अभिनेत्री व मॉडेल

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०१ : विष्णूदास अमृत भावे मराठी रंगभुमीचे जनक, त्यांची पन्नासहून अधिक नाट्याख्याने 'नाट्य्‌कवितासंग्रह' या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. (जन्म: ? ? १८१९)
१९४८ : हुगो बॉस कानी चे संस्थापक हुगो बॉस यांचे निधन. (जन्म: ८ जुलै १८८५)
१९६२ : नोबल पारितोषिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध जर्मन स्विस कवी, कादंबरीकार आणि चित्रकार हर्मन कार्ल हेसे यांचे निधन.
१९७० : ब्रिटीश कालीन भारतात तीस वर्ष तुरुंगवास भोगणारे प्रख्यात भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते व राजकारणी त्रिलोकनाथ चक्रवर्ती यांचे निधन.
१९७६ : जान निसार अख्तर ऊर्दू शायर व गीतकार (जन्म: १४ फेब्रुवारी १९१४)
१९९६ : जेट इंजिन चे शोधक फ्रँक व्हाटलेट यांचे निधन. (जन्म: १ जुन १९०७)
२००२ : शांताबाई दाणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी (जन्म: १ जानेवारी १९१८)
२०१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी कायyar सिंहनाथ राय यांचे निधन. (जन्म: ८ जून १९१५)

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून विविध विकास कामांचा आढावा

बीड। प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज जिल्ह्यातील मुख्य इमारतींचे इलेव्हेशन प्लॅन, श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर विकास आराखडा, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय आराखडा, ग्रंथालय इमारत, सहकार संकुल आदी विविध विकास कामांचा आढावा घेतला.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात झालेल्या या बैठकीस सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, धनंजय मुंडे, नमिता मुदंडा, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थिती होते.

बीड जिल्ह्याकरीता महसुल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच प्रशासकीय इमारती उभारण्यात येत आहे. या सर्व इमारती एकाच परिसरात एकसमान उभारण्यात याव्यात. तसेच जिल्ह्याकरीता उभारण्यात येणारे जिल्हा ग्रंथालय, सहकार भवन या इमारती सुसज्ज आणि सर्व सुविधा असलेल्या उभारण्यात याव्यात. संबंधीत विभागानी या इमारतीमध्ये अधिकारी-कर्मचारी आणि नागरिकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करावा. या सर्व प्रशासकीय इमारती उभारण्याचे काम अतिशय गतीने आणि दर्जेदार होतील याकडे लक्ष द्यावे. तसेच प्रत्येक इमारतीमध्ये सुर्यप्रकाश, व्हेंटीलेशन आणि सोलर सिस्टीमचा समावेश करावा. तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामिण वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, सुमारे ५० वर्ष जूने असुन, ज्या इमारती कालबाह्य झाल्या आहेत, त्या इमारती धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या धर्तीवर उभारण्यासाठीचा विकास आराखडा तयार करावा. तसेच या रुग्णालयात रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय उपचारांच्या सुविधा येथे उपलब्ध करण्यासाठी प्रस्ताव तयार करुन पाठवावा. तसेच याठिकाणी काम करणारे अधिकारी-कर्मचारी यांची निवासस्थाने सुसज्ज व सर्व सुविधा असतील याची काळजी घ्यावी. रुग्णालयाच्या विकासासाठी नियमानुसार जे काही लागणार आहे, त्याचा प्लॅन तयार करुन सादर करावा.त्यास मान्यता आणि निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडून परळी वैजनाथ येथे रु.२८६.६८ कोटींचा तिर्थक्षेत्र विकास आराखड्यास सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पात काही बदल सुचवून रु.३५१.०० कोटी रक्कमेच्या सुधारित आराखड्यास जिल्हास्तरीय समितीमध्ये मान्यता देण्यात आली. आता हा आराखडा अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्यास लवकरच मान्यता प्राप्त करुन घेण्यात येईल. परंतू श्री क्षेत्र परळी वैजनाथ मंदिरास त्याचे पूरातन मुळ स्वरुप प्राप्त करण्यासाठीचा तसेच मंदिर परिसराचा विकास आराखडा तयार करावा. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी उभारण्यात येणाऱ्या सर्व इमारतीची संबंधीत अधिकारी आणि वास्तूरचनाकार यांच्याकडून सविस्तर आढावा घेवून आवश्यक त्या सूचना दिल्या.

बीड - अहिल्यानगर रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून त्याची चाचणी देखील यशस्वी झाली आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनापासून बीड-मुंबई रेल्वे सुरु व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले. तसेच अंबेजागाई येथील लमान तांडा येथे नवीन कारागृहासाठी लागणाऱ्या जागेसाठी पाठपूरावा करुन यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच कंकालेश्वर देवस्थानाची असलेली १२ एकर जागेस संरक्षण भिंत उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करुन सादर करावा असे निर्देश दिले.



**महसूल भवनाचे भूमिपूजन :** जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील महसुल भवनाचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज भूमिपूजन झाले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगतीपथावर असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाची देखील पाहणी करत संबंधीतांकडून महसूल भवन आणि जिल्हाधिकारी कार्यालयाची माहिती घेवून संबंधीतांना आवश्यक त्या सूचना केल्या. तसेच इमारतीचे काम दर्जेदार करण्याच्या सूचनाही संबंधीतांना त्यांनी दिल्या. यावेळी सर्वश्री विक्रम काळे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थिती होते.

## वारकरी संप्रदायाचे मूळ नाथपरंपरेतून आहे -खोले

### श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भाविक भक्तांची प्रचंड गर्दी



बीड। प्रतिनिधी

जगाच्या पाठीवर वारकरी हा एकमेव संप्रदाय आहे जो ७०० ते ८०० वर्षापासून सुरू आहे. अनेक आक्रमण झाली परंतु वारकरी संप्रदाय तक धरून आहे या वारकरी संप्रदायाचे मूळ नातं परंपरेतून आहे असे गौरव उद्गार विशाल महाराज खोले यांनी केले. विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या मध्ये बुधवारी कीर्तन सेवा ह.भ.प. विशाल महाराज खोले मुक्ताई नगर यांनी समर्पित केली. यावेळी खोले महाराज बोलत होते.

जगाच्या पाठीवर वारकरी हा एकमेव संप्रदाय आहे जो ७०० ते ८०० वर्षा पासून सुरू आहे अनेक आक्रमण झाली परंतु वारकरी संप्रदाय तग धरून आहे. आणि चंद्र सूर्य असे पर्यंत अजरामर झाला आहे. या वारकरी संप्रदयाचं मूळ हा नाथ परंपरा आहे. गहिनीनाथ महाराजांनी संत निवृत्तीनाथ महाराज यांना दिक्षा दिली. निवृत्तीनाथ महाराज यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांना दिली आज संत ज्ञानेश्वर महाराज यांनी जगाला संदेश दिला. आज वारकरी संप्रदाय दिसत आहे तो नाथ परंपरेतून आला आहे. आज गोरक्षनाथ टेकडीवर जन समुदाय दिसत आहे. तो फक्त गुरू किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा यांच्या त्याग व तपाच फलित आहे. नाथांनी आपल आयुष्य जगाच्या कल्याणासाठी समर्पित केले. आदिनाथ, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ, चरपटीनाथ यांनी आपलं आयुष्य जगाच्या कल्याणासाठी समर्पित केलं. नाथ परंपरा ही जगाचं कल्याण करण्यासाठी अहोरात्र काम करत आहे. असे विवेचन खोले महाराज यांनी केले. त्यांना मृदुंगसाथ महाराज यांनी दिली. आज संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथावर प्रवचन झाले. बुधवारी खोले महाराज यांच्या कीर्तन सेवेलाला भाविक भक्तांची प्रचंड गर्दी होती.

## सावरगाव (सोने) येथे ५०० फळझाडांची वृक्षलागवड

**बीड। प्रतिनिधी**

**जिल्हा प्रशासनाच्या 'हरित बीड' उपक्रमांतर्गत एकाच दिवशी ३० लाख झाडे लावण्याच्या संकल्पात सावरगाव (सोने) या छोट्याशा गावाने मोठा सहभाग नोंदवत ५०० फळझाडांची लागवड करून निसर्गप्रेमाचे जिवंत उदाहरण उभे केले. ग्रामपंचायत कार्यालय ते जिल्हा परिषद शाळेच्या मार्गावर आंबा, पेरू, चिकू, नारळ, चिंच, सीताफळ आदी हंगामी फळझाडांनी रस्ता हिरवळला आणि गावाने पर्यावरण रक्षणाचा ठोस संदेश दिला.**

कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामपंचायतीचे सरपंच नारायण नागरगोजे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच अभिमन्यू राख, ग्रामविकास अधिकारी गणेश जाधव, मुख्याध्यापक संतोष गव्हाणे, विकास वनवे, सामाजिक कार्यकर्ते विजय बडे, विजय वायबसे, दीपक नागरगोजे,संगिता धर्मपात्रे, दुर्गा बाबर, बाळू राख आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच नारायण नागरगोजे यांनी झाडे लावणे ही फक्त योजना नाही, ती आपल्या पुढच्या पिढीसाठीची जबाबदारी आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतरस्त्यांवर तसेच बांधांवर वृक्षलागवड करून हरितक्रांती घडवावी असे आवाहन केले. हरित बीड या उपक्रमाअंतर्गत सोने सावरगाव ग्रामपंचायतीने गावात लावलेल्या प्रत्येक झाडाला लोखंडी जाळीचे संरक्षण देण्यात आले असून, त्यांची देखभाल गावातील स्वयंसेवकांच्या मदतीने करण्यात येणार आहे. ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेऊन झाडांची निवड, खड्डे खोदणे, लागवड आणि जाळी बसवण्याचे काम एका दिवसात पूर्ण केले. या वृक्षारोपण कार्यक्रमास ग्रामस्थ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वृक्षलागवड हा केवळ उपक्रम नाही तर विद्यार्थ्यांना कृतीतून दिला जाणारा जीवनाचा धडा आहे. सावरगाव (सोने) ग्रामस्थांनी ५०० फळझाडांची लागवड करत पर्यावरण रक्षणासोबत शिक्षण, जबाबदारी आणि पुढच्या पिढीसाठीचा विचार यांचे सुंदर उदाहरण घालून दिले आहे. वृक्षलागवड ही विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा एक भाग असून पर्यावरण संवर्धनाची मूल्ये त्यांच्यात रुजवणं गरजेचं आहे.

**- विकास वनवे,**
**सहशिक्षक, जि.प.शाळा सावरगाव सोने**

## शिरूर कासार तालुक्यात वृक्ष लागवड मोहीम



शिरूर । प्रतिनिधी


बीड जिल्ह्यात आज पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तीस लक्ष वृक्ष निवड मोठ्या उत्साहात राबविण्यात येत आहे. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच नागरिक या मोहिमेची पूर्वतयारी अनेक दिवसापासून करीत होते.

शिरूर कासार तालुक्यात आज ही वृक्ष लागवड मोहीम जोमात राबविण्यात आली. तहसील कार्यालय परिसर, दिवाणी न्यायालय परिसर, वनविभागाच्या जमीनी, शिक्षण विभागाच्या सर्व शाळा आणि महाविद्यालय, ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक मोकळ्या जागा तसेच रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड, नगरपंचायतीच्या हद्दीतील रस्ते व सार्वजनिक ठिकाणी स्मशानभूमीची जागा यासह खाजगी शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये तसेच घरासमोरील मोकळया जागेत मोठ्या उत्साहवर्धक वातावरणात ३० लक्ष वृक्ष लागवडीमध्ये प्रशासनाच्या जोडीस लोकप्रतिनिधी व नागरिक सहभागी झाले होते. यामध्ये वनविभाग ३२०००, सामाजिक वनीकरण ४५०००, नगरपंचायत १००००, रेशीम विभाग ५५००० शिक्षण विभाग १०,००० ग्रामपंचायत ५२००० इतके उद्दिष्ट देण्यात आले होते. शिरूर कासार तालुक्यात सर्व शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, शेतकरी इत्यादी मिळून जवळपास १,८०,००० इतकी वृक्ष लागवड केल्याचे आकडेवारी समोर आलेली आहे.

## वै.वाचासिद्धी श्री संत बप्पाजी बाबांचा पुण्यतिथी सोहळा

बीड । प्रतिनिधी

महान संत,वाचासिद्धी श्रीसंत बप्पाजी बाबा यांच्या ५२ व्या पुण्यतिथी निमित्त श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संस्थान मौजे.बांगरवाडा ता.जि.बीड येथे सोमवार दि ११ पासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



श्रीसंत बप्पाजी बाबा हे वाचासिद्धी संत म्हणून प्रसिद्ध होते.श्रीसंत वामनभाऊ,श्रीसंत भगवान बाबा, श्रीसंत ईश्वर भारती बाबा यांचे समकालीन संत होते.त्यांनी त्यांच्या विचारातून अनेक लोकांना सन्मार्गाला लावण्याचे काम केले.बाबांचे कार्य अलौकिक होते.त्यांची यावर्षी ही ५२ वी पुण्यतिथी आहे. या पुण्यतिथी सोहळ्या मध्ये अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.त्यामध्ये शिवलीलामृत पारायण, गाथा भजन,प्रवचन,हरकीर्तन,भारुड, महाप्रसाद आदी कार्यक्रम पार पडणार आहेत.सोमवार दिनांक ११/८/२०२५ रोजी सकाळी ११वाजता पुष्पवृष्टी होऊन वीणा उभा राहील.आणि कार्यक्रमाला सुरुवात होईल.दिनांक ११ रोजी दुपारी प्रवचन आणि रात्री ९ ते ११ श्री.ह.भ.प.विनोद मूर्ती,महंत मधुसूदन महाराज सरस्वती (माऊली संस्थान, राजापूर)यांचे कीर्तन होईल. दिनांक १२ रोजी रात्री ९ ते ११ श्री.ह.भ.प.महंत लक्ष्मण महाराज मेंगडे (बंकट स्वामी महाराज संस्थान निनगुर )यांचे कीर्तन होईल. दिनांक १३ रोजी सकाळी ११ ते १ श्री.ह.भ.प.१००८ महामंडलेश्वर त्रिविक्रम शास्त्री सरस्वती (गणेशांनद गड, पिंपळनेर)यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल.त्यानंतर महाप्रसाद होईल. या कार्यक्रमासाठी परिसरातील सर्व मंडळी उपस्थित राहतील.सर्वांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन.ह.भ.प.जनार्दन महाराज बांगर व समस्त गावकरी मंडळी मौजे बांगरवाडा यांनी केले आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

CNR No. MHBI02000025612025

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १२४२/२०२५**

**मार्फतएस.एम.सोंडगे**

**सुनिता शिवाजी नन्नवरे व इतर ४ वि. निरंक**

अर्जदार:- १. सुनिता भ्र. शिवाजी नन्नवरे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. साक्षळपिंप्री ता. जि. बीड २. चंद्रकांत पि. शिवाजी नन्नवरे, वय-२४ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे ३. ओमकार पि. शिवाजी नन्नवरे, वय-२२ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे ४. सिताबाई भ्र. रामा नन्नवरे, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे ५. रामा पि. भाउराव नन्नवरे, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे

विरुध्द निरंक मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलग २ नुसार मयताचे वारस म्हणून मिळणे बाबत. वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत शिवाजी रामा नन्नवरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत शिवाजी रामा नन्नवरे यांचा मृत्यु दिनांक ०७/०८/२०१० रोजी राहते घरी साक्षळपिंप्री ता. जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले व अर्जदार क. ४ ते ५ हे मयताचे आई-वडील आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत शिवाजी रामा नन्नवरे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक ''राज्य लोकतंत्र मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास है न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी

प्रकरणातील पुढील तारीख ०८/०९/२०२५

आज दिनांक ०५ माहे ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

स्वाक्षरित क लिपीक | शिक्का | आदेशावरून स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## संतोष काशीद पाटील यांना पितृशोक

बीड। प्रतिनिधी



बीड जिल्हा न्यायालयात कार्यरत असलेले कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन संतोष काशीद पाटील यांचे वडील सर्जेराव साहेबराव काशीद पाटील यांचे आज हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. बीड जिल्हा न्यायालयात कलार्क पदावर कार्यरत असलेले सर्वांशी मिळून मिसळून राहणारे कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन संतोष पाटील यांचे वडील सर्जेराव साहेबराव पाटील यांना आज सकाळी सहा वाजता हृदयविकाराचा तीव्र झटका आला त्यांना तात्काळ हॉस्पिटलमध्ये दाखल केले मात्र डॉक्टरांनी त्यांना मृ त घोषित केले यामुळे संतोष पाटील यांच्या नातेवाईकासह मित्र परिवारात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे संतोष पाटील यांच्या वडीलाचे मृत्यू समयी वय ८४ वर्ष एवढे होते त्यांच्या पाश्चात दोन मुले एक मुलगी सुना नातवंड असा मोठा परिवार आहे आज त्यांच्यावर अंकुश नगर येथील समशान भूमी मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले तर सावडण्याचा कार्यक्रम शुक्रवार दिनांक आठ ऑगस्ट रोजी ठीक आठ वाजता होईल संतोष काशीद पाटील यांच्या परिवाराच्या दुःखात सर्व मित्र कंपनी सहभागी आहे

## लिंबागणेश येथे पोलिस प्रशासनाच्या वतीने वृक्षारोपण

लिंबागणेश। प्रतिनिधी

हरित महाराष्ट्र अभियानाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात येणाऱ्या हरित बीड या संकल्पनेतून आज दि. ०७ गुरुवार रोजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

या अभियानात जिल्हा प्रशासनाने वर्षभरात १ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प केला असून, आज एकाच दिवसात ३० लाख झाडांची लागवड करून हा विक्रम '' इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड ''मध्ये नोंदवण्याचा मानस आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने जिल्हा प्रशासन, शासकीय संस्था आणि सामाजिक संघटनांना विशेष सूचना देत वृक्षलागवडीत सामूहिक सहभागाचे आवाहन केले आहे.या मोहिमेअंतर्गत बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायतच्या वतीने सार्वजनिक स्मशानभूमी, गणेश मंदिर, ग्रामपंचायत परिसर या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी नेकनूर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, नेकनूर पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, तसेच पिंपळवंडी बीटचे सहाय्यक फौजदार गोविंद बडे उपस्थित होते. वृक्षलागवडीत सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर, डॉ.गणेश ढवळे,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, तसेच बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, अक्षय वाणी, औदुंबर नाईकवाडे, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, सुरेश निर्मळ, नाना वाणी, बालाजी निर्मळ, अशोक जाधव, जिवन मुळे, सुखदेव वाणी, शरद भोसले,केशव गिरे यांच्यासह ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला.



## तुकाराम मुंढे यांची बदली रद्द करा-डॉ. संजय तांदळे

बीड । प्रतिनिधी

राज्यातील धडाडीचे,क्रियाशील, कर्तव्यदक्ष व दबंग भारतीय प्रशासन सेवेतील आय.ए.एस. अधिकारी अशी ओळख असलेल्या तुकाराम मुंढेंची पुन्हा एकदा दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी मंगळवारी सायंकाळी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बदली करण्यात आली आहे. २० वर्षांच्या सेवेत मुंडेंची २३ साव्यांदा असंघटित कामगार आयुक्त पदावरून दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना मंत्री आणि राजकीय नेते कधीही एका जागेवर राहू देत नाही नियमानुसार सर्वसाधारणपणे तीन वर्षात बदली होणे अपेक्षित असताना २० वर्षांमध्ये २३ वेळा बदली करण्यात आली आहे. तुकाराम मुंडेंची आतापर्यंत झालेली बदली आणि खाती (२००५-२०२५ पर्यंत) १. ऑगस्ट २००५ -प्रशिक्षणार्थी, उपजिल्हाधिकारी, सोलापूर २. सप्टेंबर २००७ -उपजिल्हाधिकारी, देगलूर उपविभाग३. जानेवारी २००८ सीईओ, जिल्हा परिषद, नागपूर ४. मार्च २००९ आयुक्त, आदिवासी

विभाग५. जुलै २००९ सीईओ, वाशिम६. जून २०१० - सीईओ, कल्याण७. जून २०११ जिल्हाधिकारी, जालना८. सप्टेंबर २०१२ - सहा आयुक्त विक्रीकर, मुंबई९. नोव्हेंबर २०१४ जिल्हाधिकारी, सोलापूर १०. मे २०१६ आयुक्त, नवी मुंबई११. मार्च २०१७ -मुख्य कार्यकारी अधिकारी, पीएमपीएल, पुणे १२. फेब्रुवारी २०१८ आयुक्त, नाशिक महापालिका १३. सहसचिव, नियोजन १४. डिसेंबर अधिकारी, एड्स नियंत्रण, मुंबई १५. आयुक्त, नागपूर महापालिका. नोव्हेंबर २०१८ २०१८ प्रकल्प जानेवारी २०२० ऑगस्ट २०२० सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई १७. जानेवारी २०२१ - राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, भारत १८. सप्टेंबर २०२२ -आयुक्त, आरोग्य सेवा आणि संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान (१९. नोव्हेंबर २०२२ अचानक बदली, प्रतीक्षेत ठेवण्यात आले (चा कार्यकाल फक्त २ महिने) २०. एप्रिल २०२३ सचिव, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभाग२१. जून २, २०२३ सचिव, मराठी भाषा विभाग२२. जुलै २०२३ कृषी आणि पशुसंवर्धन विभाग सचिव म्हणून बदली पुढे चालू राहिली. २३. ५ ऑगस्ट २०२५ रोजी मुंडे यांची २३ व्यांदा बदली करण्यात आली असून त्यांना आता दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत यांची झालेली बदली रद्द करण्यात यावी किंवा सध्या झालेल्या नियुक्तीवर किमान तीन वर्ष काम करण्याची यांना संधी द्यावी अशी मागणी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने अध्यक्ष डॉ. संजय तांदळे ,सुदाम कोळेकर, डॉ. लक्ष्मण पवळ ,बाजीराव ढाकणे यांनी दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार उगलमुगले मॅडम यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

# वृक्ष लागवडीसाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे -ना.अजित पवार

## कार्यक्रम सुरू असताना ३० लाख २४२७ वृक्ष लागवडीची नोंदणी

बीड । प्रतिनिधी

वृक्ष लागवड ही काळाची गरज असून बीड जिल्ह्याने एक कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. आजच्या कार्यक्रमातच त्यांनी तीस लाख झाडे लावण्याचा संकल्प पूर्ण केला असून यासाठी ज्या व्यक्तींनी संस्थांनी योगदान दिले. त्या सर्वांचे मी अभिनंदन करतो अशा शब्दात बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि सामाजिक संस्थांचा अजित दादा पवार यांनी गौरव केला. बीड शहरातील खंडेश्वरी परिसरामध्ये बीड तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानात तीस लाख वृक्ष लागवडीचा संकल्प आणि टाटा ट्रेनिंग सेंटरच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उद्योग मंत्री उदय सामंत, बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आ. प्रकाश सोळंके, आ. सुरेश धस, आ. संदीप क्षीरसागर, आ. नमिता मुंदडा , आ. विक्रम काळे ,आ. सतीश चव्हाण, आ. विजयराजे पंडित, युवा नेते डॉ .योगेश क्षीरसागर यांच्यासह उपमुख्यमंत्री कार्यालयातील अधिकारी, जिल्हा अधिकारी एक जॉन्सन मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन, वनाधिकारी सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात बोलताना अजितदादा म्हणाले की बीड जिल्ह्यामध्ये वनक्षेत्र कमी असल्याने या ठिकाणी वृक्ष लागवड होणे महत्त्वाचे आहे. राज्य सरकारने आगामी चार वर्षात ४०० कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. दरवर्षी १०० कोटी झाडे लावणार असून रस्त्याच्या कडेलाही देशी झाडे लावली जातील. ही झाडे लावणे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच त्याच्या संगोपन होणे महत्त्वाचे आहे. ही झाडे जगवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावा असे अजितदादा म्हणाले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक पेड मा के नाम हा संकल्प केला आहे. याला महाराष्ट्राने उत्तम प्रतिसाद देऊन सरस कामगिरी केली आहे. बीडमध्ये एक कोटी झाडे लावण्याचा संकल्प केल्याने यासाठी जे जे योगदान देतील त्या सर्वांना धन्यवाद देतो असे अजित दादा म्हणाले. झाडे लावली तरच हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र ही संकल्पना पुढे जाईल आगामी



वीस वर्षे हे अभियान आपल्याला राबवावे लागेल. यासाठी लोकप्रतिनिधी पासून सर्वसामान्य माणसापर्यंत सर्वांनी सर्वांचेच योगदान महत्त्वाचे आहे. सर्वांनी हा संकल्प पूर्ण केला तरच आगामी काळात नागरिकांचे जीवन सुकर होईल. शेवटी अजित दादा यांनी या सामाजिक संस्थांनी व शिक्षण संस्थांनी हा संकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले त्या सर्वांचे आभार मानले.

याचवेळी बोलताना अजित दादा म्हणाले की बीडमध्ये टाटा इन्स्टिट्यूट च्या वतीने सी आय आय टी या ट्रेनिंग सेंटरचे बांधकामाचा शुभारंभ आज झालेला आहे. आज उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आपल्याला जागा उपलब्ध करून दिली त्यांचे आभार. या सेंटरमुळे बीड जिल्ह्यामध्ये कुशल कारागीर निर्माण होतील. तरुण मुलांना जिल्ह्यामध्ये उद्योग पूरक शिक्षण मिळून उद्योगाचे वातावरण निर्माण होईल. उत्तम दर्जाच्या नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. टाटा इन्स्टिट्यूटने ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल अजितदादा यांनी त्यांचे आभार मानले. महाराष्ट्रात टाटा इन्स्टिट्यूटने २१००० कोटी रुपये दिल्याचे सांगतानाच राज्य सरकारनेही यासाठी ५०० कोटीचा निधी दिल्याचे त्यांनी सांगितले. बीड नंतर आता नांदेड येथेही अशा प्रकारचे इन्स्टिट्यूट सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे लाखो विद्यार्थ्यांना कुशल कारागीर म्हणून हाताला काम मिळेल. बीड जिल्ह्यातील शेतकरी आणि शेतमजुरांच्या मुलांनी या ट्रेनिंग सेंटर चा फायदा घ्यावा असे सांगताना त्यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी एमआयडीसी मध्ये जागा उपलब्ध करून दिली याबद्दल त्यांनाही धन्यवाद दिले. यावेळी बोलताना उदय सामंत म्हणाले की दादांनी आठ दिवसात जिल्हा क्रीडा संकुलाला २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून ◀◀ पान ३ वर

# १५ ऑगस्ट डिजिटल इंडिया फाऊंडेशन डे जाहिर करा खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान मोदींकडे मागणी



बीड । प्रतिनिधी

भारताच्या इंटरनेट युगाला ३० वर्षे पूर्ण झाले असून १५ ऑगस्ट हा डिजिटल इंडिया फाउंडेशन डे जाहीर करण्याची मागणी खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी व संचारमंत्री ज्योतिरादित्य राजे शिंदे यांच्याकडे केली आहे.

बीडचे खा.सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, भारतामध्ये सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू होऊन यंदा ३० वर्षे पूर्ण होत आहेत. १५ ऑगस्ट १९९५ रोजी विदेश संचार निगम लिमिटेड मार्फत सार्वजनिक इंटरनेटचा शुभारंभ झाला होता. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व संचार मंत्री यांना पत्र लिहून १५ ऑगस्ट २०२५ हा दिवस डिजिटल इंडिया फाउंडेशन डे म्हणून साजरा करण्याची मागणी केली आहे. सन १९८६ साली सुरु झालेली भारताची डिजिटल क्रांती ही केवळ व्यापारापुरती मर्यादित नव्हती, तर ती शिक्षण,संशोधन व आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले एक दूरदृष्टीपूर्ण पाऊल होते.

◀◀ पान ३ वर



## साधुसंत येती घरा.. तोची दिवाळी तोच दसरा..!

**बीड – वैकुंठवासी सद्गुरु किसन बाबा महाराजांच्या पुण्यस्मरणानिमित्त गोरक्षनाथ टेकडी येथे विशाल महाराज खोले आले असता त्यांनी पसायदान सेवा प्रकल्पास सदिच्छा भेट दिली. यावेळी प्रकल्प संचालक गोवर्धन दराडे व रंजनाताई दराडे यांनी त्यांचा सत्कार केला.**

# घरफोड्या करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

बीड । प्रतिनिधी

केज परिसरामध्ये घरफोड्या, विद्युत तार ,टायर आदींच्या चोऱ्या करणाऱ्या टोळीचा गुन्हा अनुसंशाने परदा फास्ट केला असून पिकप सहआरोपींना ताब्यात घेतले आहे.

गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन समांतर तपास करुन आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन मा.पो.नि. शिवाजी बंटेवाड यांनी पोउपनि महेश विघ्ने यांना केले. यावरुन पोउपनि विघ्ने हे त्यांचे पथकासह केज उपविभागत आरोपीतांचा शोध घेण्या करीता रवाना झाले. केज पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बामतीदारामार्फत खात्रीलायक माहीती मिळाली की,



कन्हेरवाडी येथील विशाल काळे हा त्याचे कडील पिक वाहन क्र.एम.एच.२३ ए.यु.५८९० या गाडीमध्ये चोरी केलेली ॲल्यमीनिअमची तार विक्री करण्याकरीता रात्रीचे वेळी केज येथे येणार आहे अशी माहीती प्राप्त झाली. यावरुन पोलीस स्टाफसह १९.३० वा सुमारास केज साळेगाव रोडवर सदरचे वाहन थांबवुन तपासले असता सदर वाहनात ॲल्युमिनीअम तारेचे बंडल व चार टायर डिस्कसह व एक मोठे कटर मिळुन आले. वाहन चालक विशाल काळे यास सदरची तार व टायर कोणाचे आहेत असे विचारले ◀◀ पान ३ वर

# अंबाजोगाई शहरात चोरट्यांनी एकाच रात्रीत ४ दुकाने फोडली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील चोरट्यांनी बुधवार रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी शहरातील विविध भागांतील मुख्य रस्त्यावर असलेल्या ४ ठिकाणची दुकाने फोडून हजारो रुपयांचा माल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही सर्व ठिकाणे वर्दळीच्या परिसरात असूनही चोरट्यांनी निर्भीडपणे हात साफ केल्याने पोलीस प्रशासनावर नागरिक प्रश्नचिन्ह निर्माण करत अंबाजोगाई विभागात नुकतेच रुजू झालेले डी वाय एस पी शिंदे यांना चोरट्यानी सलामीच दिल्याचे नागरिकांतून बोलल्या जात आहे.

नगरपरिषदे समोर असलेल्या मुख्य रस्त्यावरील पॅराडाईज वाईन शॉप ,प्रशांत नगर मधील डॉ तट यांचा दाताचा दवाखाना , बनाळे यांचे किराणा दुकान, तसेच कलावती हॉस्पिटल खाली असलेले




मेडिकल स्टोअर अशी ४ दुकाने चोरट्यानी फोडले आहेत. या चोऱ्यांमध्ये नेमका कितीचा ऐवज चोरीला गेला आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पॅराडाईज वाईन शॉपमध्ये स्कॉर्पीओ गाडीतून आलेल्या ३ चोरट्यांनी चोरी केली असल्याचे प्राथमिक सीसीटीव्ही फुटेज मधून समोर आले आहे विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच एका पोलीस कर्मचाऱ्याच्या घरीही चोरी झाली होती त्या प्रकरणातील चोर अजूनही पोलीसांच्या हाती लागलेले नाहीत त्यातच आता पुन्हा ४ दुकाने फोडून चोरट्यांनी पोलीस यंत्रणेलाच थेट आव्हन दिल्याची चर्चा शहरात सुरू आहे. दरम्यान रात्रीच्या वेळी पोलिसांचे गस्ती पथक कार्यरत असते. गस्तीसाठी पोलीसांची गाडी रात्री फिरते परंतु इतक्या वर्दळीच्या परिसरात सलग ४ ठिकाणी चोरी होत असताना गस्ती पथक काय करत होते असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत या घटनांमुळे व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाले असून पोलीसांनी तातडीने ठोस कारवाई करून चोरांचा शोध घ्यावा अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

# मा.आ.भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित कृषी महाविद्यालयात रक्तदान शिबिर व अभिष्टचिंतन सोहळा

आष्टी । प्रतिनिधि

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदार संघाचे मा.आ .तथा आंनद चॅरिटेबल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसा निमित मंगळवार दि.५ ऑगस्ट २०२५ रोजी आनंद शैक्षणिक संकुल गंगाईनगर मधील कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना तसेच ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे व अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आनंद



शैक्षणिक संकुल मधील कृषी महाविद्यालय, अन्नतंत्र महाविद्यालय, इंजीनिअरिंग, तंत्रनिकेतन, कृषी व पशुसंवर्धन विद्यालय, तसेच सामाजिक कार्यकर्ते यांनी या रक्तदान शिबिरात सहभाग घेतला कृषी महाविद्यालय तर्फे मा. आ .भीमराव धोंडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा सत्कार व केक कापून करण्यात यावेळी मा. आ. भीमराव धोंडे यांनी आपले विचार व्यक्त केले तर प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ यांनी प्रास्ताविक करून साहेबांना प्रशासन अधिकारी, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. रक्तदान शिबिराचे मा . आ.भीमराव धोंडे साहेब यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले या रक्तदान शिबिरात १०७ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी प्रशासन अधिकारी डॉ. डी बी राऊत, प्रा.शिवदास विधाते, श्री.माऊली बोडखे, श्री.संजय शेंडे, श्री.संदिप नन्नवरे, श्री.सागर वाघुले, झुंजार नेता चे उपसंपादक श्री.उत्तम बोडखे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ, प्राचार्य साईनाथ मोहोळकर, प्राचार्य संजय बोडखे, प्राचार्य डॉ सतिषचंद्र रागीट, प्राचार्य उद्धव घुले, सामाजिक कार्यकर्ते,प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी उपस्थित होते.



**आष्टी : आनंद चार टेबल चे अध्यक्ष शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राजश्री शाहू कृषी महाविद्यालयाच्या वतीने रक्तदान शिबिलीचे आयोजन करण्यात आले होते अष्टविनायक रक्तपेढी अहिल्यानगर च्या वतीने रक्तदान घेण्यात आले यावेळी १०३ विद्यार्थ्यांनी व कर्मचाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी रक्तदान केले यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री राम आरसुळ प्राध्यापक हरीश चाऊस प्राचार्य संजय बोडखे प्राचार्य सुनील कोल्हे आदी उपस्थित होते**

# मोठेवाडीत ५०० झाडांचे वृक्षारोपण



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्यावतीने गावातील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत कार्यालय,संत सावता महाराज मंदिर परिसर व स्मशान भूमी परिसरात पाचशे झाडांचे वृक्षारोपण दि ०७ ऑगस्ट गुरूवार रोजी करण्यात आले.

वृक्षारोपणा मध्ये चिंच,आवळा,वड, अशोक,करंजी, पारिजातक,लिंब या अशा अनेक झाडांचे वृक्षारोपण गावातील ग्रामस्थांच्या हस्ते परिसरात करण्यात आले.यावेळी झांडाच्या संगोपनासाठी सर्वांनी संकल्पही केला.यावेळी पंचायत समितीचे अधिकारी घनघाव, ग्रामविकास अधिकारी बिभिषण डोरले,सरपंच सौ.सत्यभामा दळवी,उपसरपंच सौ.सुभद्राबाई खेत्री,माजी सरपंच अविनाश गोंडे, अंगद खेत्री,राहुल सुरवसे,गणेश सर्जे, मुख्याध्यापक तुकाराम शिंदे, शिक्षक उत्तम ढवळे, अंगणवाडी सेविका,मदतनीस, आशा व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

# पाचलेगावकर महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त सप्ताहाची सांगता

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री संत पाचलेगावकर महाराजांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त बुधवार (ता.३०) ते बुधवार (ता.०६) दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची सांगता बुधवारी (ता.०६) पालखीने करण्यात आली.

गाढे पिंपळगाव येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री संत पाचलेगावकर महाराजांच्या ३९ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन राष्ट्रसंत पाचलेगावकर महाराज भक्त मंडळ, ज्वारी धान्य बॅंक व समस्त गावकरी मंडळींच्या वतीने करण्यात आले होते. या सप्ताहात बाळू महाराज जोशी उखळीकर यांच्या वाणीतून भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. सात दिवस चाललेल्या या कथेत भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या कथेची सांगता मंगळवारी (ता.०५) झाली. तर आठ दिवस रोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. सप्ताहात पांडुरंग महाराज मुंडे जहांगीरमोहा, एकनाथ महाराज काळे एरंडेश्वर, पांडुरंग महाराज कोकाटे नांदगाव, उध्दव महाराज रमजानपुरकर, एकनाथ महाराज माने, महादेव महाराज बोराडे शास्त्री, किशोर महाराज बुरांडे तर विजयानंद महाराज सुपेकर यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. बुधवारी (ता.०७) श्री संत पाचलेगावकर महाराज यांच्या प्रतिमेची पालखी मिरवणूक काढण्यात आली. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.






# आपली आष्टी, हरित आष्टी' वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ

आष्टी । प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने ''आपली आष्टी, हरित आष्टी'' या संकल्पनेतून वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ आज आष्टी शहरातील गवारे वस्ती रोड, उपबाजार समिती परिसर आणि घनकचरा व्यवस्थापन केंद्र परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाचा शुभारंभ आमदार मा. श्री. सुरेश धस यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

कार्यक्रमात आमदार सुरेश धस यांनी स्वतः झाडे लावून मोहिमेत सहभाग नोंदवला. याप्रसंगी सुरेश धस म्हणाले , ''प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन ◀◀ पान ३ वर

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात पाच हजार वृक्षांची लागवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

**सुंदरराव सोळंके महाविद्यालय व नगर परिषद माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या परिसरात दिनांक ७ ऑगस्ट गुरुवार रोजी पाच हजार झाडांची लागवड करण्यात आली.**

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने एक पेड मॉ के नाम २.० योजने अंतर्गत व महाराष्ट्र शासनाच्या हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र,झाडे लावूया प्रदूषण मुक्त भारत बनवूया या योजनेअंतर्गत नगर परिषद माजलगाव व सुंदरराव सोळंके महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या परिसरात जवळपास ५००० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणा दरम्यान विविध प्रकारच्या वृक्षांची




लागवड करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.जी.के.सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन.के. मुळे,नगर परिषदचे मुख्याधिकारी पोपट निघळ, उपप्राचार्य प्रकाश गवते,उपप्राचार्य पवनकुमार शिंदे, एन.एस. एस.कार्यक्रमाधिकारी प्रा.उमेश राठोड, प्रबंधक प्रशांत चव्हाण,के. बी.भोंडवे,एकनाथ मस्के,न.प चे विघ्नेश मुंडे,शिवहर शेटे,आयुब पठाण, अजय मुंडे,विशाल टाकणखार,अक्षय धारक यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी तसेच नगरपरिषद कर्मचारी, महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनी यांनी वृक्षारोपणामध्ये सक्रिय सहभाग घेऊन वृक्षारोपण केले.यावेळी वृक्षारोपण केलेल्या झाडांचे संगोपन करून झाडे वाढविण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरी पालिकेच्या आयुक्तांकडून विधानसभा उपसभापतींचा अवमान?

## बनसोडे संतापले, चौकशीची मागणी, नेमकं काय घडलं?



**पुणे । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रवेशद्वारावर विधानसभेचे उपसभापती अण्णा बनसोडेंचा अवमान झाला. शहरातील नव्यानं सादर झालेला विकास आराखडा रद्द करण्याची मागणी करणारे निवेदन देण्यासाठी अण्णा बनसोडे महानगर पालिकेत आले होते. मात्र पालिकेचे आयुक्त शेखर सिंह हजर नव्हते, ते विभागीय आयुक्त कार्यालयात बैठकीला गेले होते. परंतु इतर अतिरिक्त आयुक्तांनी उपसभापती पदाचा प्रोटोकॉल राखायला हवा होता. तसं न घडल्यानं अण्णा बनसोडे चांगलेच संतापले. त्यामुळं बनसोडेंवर पालिकेच्या पायऱ्यांवर बसून आयुक्तांचा निषेध करण्याची वेळ आली. मी या प्रकरणाची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे चौकशीची मागणी करणार आहे. आयुक्त राजकारण करत असल्याचा आरोप ही यावेळी करण्यात आला. पिंपरी चिंचवडमध्ये भाजप विरुद्ध अजित पवार गट अशी थेट लढत होणार आहे. यानिमित्ताने देवेंद्र फडणवीस विरुद्ध अजित पवार आमने-सामने उभे टाकणार आहेत. त्याची प्रचिती आजच्या या घटनेने आली.**

बनसोडे नेमकं काय म्हणाले?

अण्णा बनसोडे बोलताना म्हणाले की, आज इथं आयुक्त थांबले नाहीत, हे चुकीचं आहे. पण त्यांना माहित नाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड शहराचा विकास झालेला आहे. पिंपरी चिंचवड शहराचा विकास होत असताना नव्याने विकास आराखडा तयार करण्याचं काम गेली दोन महिन्यापासून सुरू आहे. त्या विकास आराखड्यामध्ये खऱ्या अर्थाने जे आरक्षण टाकले आहेत, त्या आरक्षण चुकीचे टाकलेले आहेत, प्रशासनावरती आणि यांच्यावरती देखरेख करायला पाहिजे, त्या पद्धतीने झालेले नाहीत, जवळजवळ ५० हजार हरकती आल्या होत्या. त्या सर्वांचा रोष धरूनच आज जन आक्रोश मोर्चा आयोजित केला होता, अशी माहिती अण्णा बनसोडेंनी दिली आहे.

पुढे बनसोडे म्हणाले, जनतेच्या मनातील प्रश्न आम्ही मांडायला इथे आलो. मात्र, इथे आयुक्त नाहीत ही दुर्दैवी बाब आहे. ते आयुक्त असले तरी ते पिंपरी चिंचवड शहराच्या भाग्यविधाते नाहीत. ते आज कमिशनर म्हणून इथे काम करत आहेत. त्यांचं आजचं वागणं दुर्दैवी आहे. आजच्या त्यांच्या वागण्याबद्दल मी देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्याकडे चौकशीची मागणी करणार आहे. आज या ठिकाणी पक्षाचे सर्व पदाधिकारी प्रमुख नगरसेवक अध्यक्ष सर्वजण या ठिकाणी आले होते, आमच्या सर्वांचा अपमान केला आहे. त्यामुळे आजचे हे निवेदन त्यांना न देता हेच निवेदन राज्याचे मुख्यमंत्री त्यांच्या स्वाधीन करतील. आज या ठिकाणी जितके शिष्टमंडळ उपस्थित आहे हेच शिष्टमंडळ उद्या जाऊन मुख्यमंत्र्यांनी निवेदन देतील असेही पुढे अण्णा बनसोडे यांनी म्हटलं आहे.

# विकृतीचा कळस! पुण्यात तरुणाकडून मादी श्वानावर अत्याचार? विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील टिंगरेनगर भागात एक संतापजनक घटना घडली आहे. बिगारी काम करणाऱ्या एका कामगाराकडून विकृतीचा प्रताप समोर आला आहे. या कामगाराने मादी श्वानावर अत्याचार केल्याचा प्रकार घडला आहे. ही घटना सी सी टिव्हीमध्ये कैद झाली आहे. याप्रकरणी एका २७ वर्षीय महिलेने विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विमानतळ पोलिस ठाण्यात या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला या स्वतः सॉफ्टवेअर इंजिनियर असून टिंगरेनगर भागातील मास्टर कॉलनी मध्ये त्यांच्या कुटुंबासोबत राहण्यास आहेत. होन्नापा अमोधीसिध्द होस्मानी या नावाचा एक व्यक्ती फिर्यादी यांच्या घरासमोर वास्तव्यास आहे. होन्नापा हा मिस्त्री असून ठिकठिकाणी तो बिगारी म्हणून काम करतो. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीनुसार, ७ जुलै रोजी होन्नापा ने फिरस्त्या कुत्र्याला कारण नसताना मारहाण करत होता. याबाबत फिर्यादी यांनी त्याला जाब विचारला असता त्याने त्यांच्याशी भांडण केले. ३ ऑगस्ट रोजी फिर्यादी यांच्या आईने पाहिलं की होन्नापा हा एका फिरस्त्या कुत्र्याला उचलुन एका पत्र्याच्या रुममध्ये घेऊन गेला. फिर्यादी यांच्या आईने त्या पत्र्याचे रुमकडे गेले असता त्याने त्या कुत्रीला तिथून सोडून दिले. यावरुन संबंधित व्यक्ती हा मादी कुत्र्यावरती अत्याचार करून तिचा छळ करत असल्याचे दिसून आलं. याअगोदर देखील त्या व्यक्तीने मादी कुत्र्यावरती अत्याचार करुन त्यांचा छळ केलेले असल्याचा संशय फिर्यादींनी व्यक्त केला आहे.

आरोपीने यापूर्वी बऱ्याच वेळा कारण नसताना भटक्या कुत्र्यांना मारहाण करुन क्रुरतेची वागणुक दिलेली असल्याचं फिर्यादीत म्हटलं आहे. तक्रारदार आणि ड रागिणी मोरे यांनी या घटनेचा पाठपुरावा केल्यानंतर विमानतळ पोलिसांनी संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे.

# आयुक्तांशी भिडणं पडलं महागात; मनसे कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यासाठी आलेल्या मनसे कार्यकर्ते आणि महापालिका आयुक्तांमध्ये मंगळवारी राडा झाला. यावेळी निवेदन देण्यासाठी आलेले कार्यकर्ते आयुक्तांच्या अंगावर धावून गेल्याने मोठा गोंधळ उडाला होता. त्यामुळे महापालिकेत एकच धावपळ उडाली. या घटनेनंतर आयुक्तांनी थेट पोलिस आयुक्तांकडे तक्रार केली होती. आता या प्रकरणात मनसे कार्यकर्त्यांनावर गुन्हा दाखल झाला आहे.



मनसे नेते अ‍ॅड. किशोर शिंदे आणि पदाधिकाऱ्यांवर इछडड १३२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे महापालिकेने झालेल्या राड्यानंतर पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी ही कारवाई केली आहे. सदर पदाधिकाऱ्यांनी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा निर्माण केला होता. त्यानुसार पुणे पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १३२ नुसार कारवाई केली आहे. महापालिका आयुक्त मंगळवारी दुपारी महापालिकेच्या शहर स्वच्छतेची बैठक घेत होते. यावेळी मनसेचे माजी नगरसेवक किशोर शिंदे हे महापालिका आयुक्त बंगल्यात गायब झालेल्या सामानाच्या प्रकरणी निवेदन देण्यासाठी आयुक्त कार्यालयात आले. मात्र, बैठक सुरू असल्याने त्यांनी भेट नाकारली.

त्यामुळे शिंदे यांच्यासह संतापलेल्या कार्यकर्त्यांनी बैठक सुरू असलेल्या हॉलमध्ये प्रवेश करत, आयुक्तांना बैठकीसाठी आम्ही थांबायचे का? असा जाब विचारला. त्यानंतर आयुक्तांनी तुमचे निवेदन द्या, मग बघू असे सुनावले. त्यानंतर आयुक्त आणि किशोर शिंदे यांच्यात शाब्दिक वाद झाला. त्याचे पर्यवसन काही वेळात एकमेकांच्या अंगावर धावून जाण्यात झाले.

यावेळी आयुक्तांनी आम्हाला गुंड म्हणाले असून, तुला बघून घेतो, घरात घुसून मारतो अशी धमकी दिल्याचा आरोप शिंदे यांनी केला. तर शिंदे आणि त्यांच्या सोबत आलेले कार्यकर्ते निवेदन देण्यासाठी नाही, तर मारण्याच्या उद्देशाने आल्याचा आरोप महापालिका आयुक्त राम यांनी केला आहे.

मनसेचे ठिय्या आंदोलन, रात्री उशीरापर्यंत गोंधळ

या घटनेनंतर मनसेचे निवेदन देण्यासाठी आलेले कार्यकर्ते आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलनास बसले. त्यानंतर काही वेळातच आयुक्तांच्या दालनाबाहेर मोठ्या प्रमाणात मनसे कार्यकर्ते जमले आणि त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे महापालिकेकडून सगळी प्रवेशद्वारे बंद करण्यात आली. या घटनेवेळी मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. तर महापालिकेने दरवाजे बंद केल्याने अनेक कर्मचारीही महापालिकेत अडकून पडले. रात्री उशिरापर्यंत हा गोंधळ सुरू होता.

# कोरेगाव पार्क हिट अँड रन प्रकरणातील आरोपीला दणका, जामिनासाठी एकामागे एक ८ अर्ज, कोर्टाने घेतला मोठा निर्णय

पुणे । प्रतिनिधी

कोरेगाव पार्क-मुंढवा रस्त्यावर घडलेल्या 'हिट अँड रन' प्रकरणातील आरोपीने एकामागून एक तब्बल आठ वेळा जामिनासाठी अर्ज करून न्यायालयांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पुणे सत्र न्यायालयाने आरोपी आयुष प्रदीप तायाल याचा जामीन अर्ज फेटाळून कायदेशीर प्रक्रियेचा दुरुपयोग केल्याप्रकरणी त्याच्यावर एक लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

हा आदेश अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांनी दिला. आदेशात त्यांनी नमूद केलं की, आरोपीने स्वच्छ हेतूने न्यायालयात येण्याऐवजी खोटेपणा, दिशाभूल आणि माहिती लपविण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे न्यायालयाच्या कामकाजात अडथळा निर्माण झाला आणि सरकारी यंत्रणेवर अनावश्यक आर्थिक ताण पडला. त्यामुळे न्यायालयाने हे प्रकरण गंभीरपणे घेत आरोपीला दंडात्मक कारवाईद्वारे धडा शिकवण्याचा निर्णय घेतला.

### १५ दिवसांच्या आत दंड जमा करण्याचे आदेश

न्यायाधीश चव्हाण यांनी आदेशात स्पष्ट केलं की, चांगले पीक घेण्यासाठी चांगल्या बियाण्यांची गरज असते; मात्र बियाणेच खराब असेल, तर पीक अपेक्षित कसे राहील? पक्षकाराचे वर्तन जर अयोग्य असेल, तर अशा प्रकरणांची हाताळणी अधिक सावधगिरीने करावी लागते, असे त्यांनी म्हटले आहे. न्यायालयाने आयुष तायाल याला १५ दिवसांच्या आत हा दंड रक्कम पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे जमा करण्याचे आदेश देखील दिले आहेत.

डिलिव्हरी बॉयला चिरडलं

आयुष तायाल (३४, रा. मगरपट्टा सिटी) याने ११ ऑक्टोबर २०२४ रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास दारूच्या नशेत भरधाव 'ऑडी' कार चालवत रौफ शेख (२१) या डिलिव्हरी बॉयला चिरडले होते. या घटनेत रौफचा जागीच मृत्यू झाला होता. याप्रकरणी मुंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, आरोपीविरोधात आरोपपत्रही दाखल करण्यात आलं आहे.

### आठव्यांदा जामीन अर्ज फेटाळला, १ लाखांचा दंड

या गुन्ह्यात आरोपी आयुष तायाल याने आठव्यांदा सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, सरकारी वकील जावेद खान यांनी याला तीव्र विरोध केला. आरोपीला जामीन मिळाल्यास तो साक्षीदारांवर दबाव टाकू शकतो, तसेच पुराव्यांशी छेडछाड करू शकतो, अशी भीती तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केली होती. सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. तसेच कायदेशीर प्रक्रियेचा दुरुपयोग केल्याप्रकरणी त्याच्यावर एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

# दोन गटात हाणामारी; थेट कोयत्याने वार, काँग्रेस नेत्याविरोधात गुन्हा दाखल



**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील नारायण पेठेत दोन गटात बोर्ड लावण्यावरून हाणामारीची घटना घडली. पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी काँग्रेसचे नेते गोपाळ तिवारी यांच्यासह सहा जणांवर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेनंतर पुण्यात खळबळ उडाली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील नारायण पेठेत २ गटात रोड वर बोर्ड लावण्यावरून हाणामारी झाली होती. कोयत्याने वार करून एका गटातील दोन जण जखमी झाले होते. या प्रकरणी स्वप्नील रामचंद्र मोरे यांनी पोलिसात तक्रार दिली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून गोपाळ तिवारी यांच्यासह सहा जणांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुकुंद शिर्के (वय २७), हर्ष शिर्के (वय २९), निखिल जगताप (वय ३३) आणि अभिषेक थोरात (वय २२) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

नेमकं काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार, येथील मुरलीधर हॉटेलजवळील रस्त्याच्या कडेला विनायक मित्र मंडळाचे कार्यकर्ते योगेश पेटकर मंडपवाले यांनी सूचना फलक लावला होता. मंगळवारी गोपाळ तिवारी व अन्य दोघे यांनी तो बोर्ड काढण्यास सुरूवात केली. त्यावेळी फिर्यादी यांनी बोर्ड काढू नका असे हर्षद शिर्के याला सांगितले. तो बेकायदेशीर असल्यास मनपा काढून घेतील, यावरून ते कोण मला सांगणारा असे म्हणत त्यांच्यात झटापट झाली. त्यानंतर मोरे पोलिस चौकीत गेले. रात्री तीन तरुणांनी पुन्हा येऊन मोरे यांच्यावर वार केले. आपल्यावरील हल्ला गोपाळ तिवारी यांच्या सांगण्यावरून झाल्याचे फिर्यादींनी तक्रारीत म्हटले आहे.

# डॉ. प्रांजल खेवलकरांचे पाय खोलात; हजाराच्या पुढे क्लिप आणि पाचशेपेक्षा जास्त तरुणी?

**पुणे । प्रतिनिधी**

**माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल मनीष खेवलकर यांच्या बाबत तपासात दररोज धक्कादायक बाबी पुढे येत आहेत. त्यांच्या मोबाईल आणि लॅपटॉपमध्ये हजाराच्या पुढे अश्लिल क्लिप आढळून आल्या असून पाचशे पेक्षा जास्त तरुणींशी संबंध ठेवल्याचे दिसत आहेत.**





यातील काही क्लिप अतिक्षय आक्षेपार्ह असून कदाचित संबंधीत तरुणींवर अत्याचार केल्याचे दिसून येत आहे. मात्र सध्यातरी तपास फक्त ड्रगशी संबंधीत प्रकरणात सुरु असल्याची माहिती पोलीस दलातील सुत्रांनी दिली.

कर्नाटकात माजी पंतप्रधान देवगौडा याचे नातू प्रज्ज्वल रेवण्णा याच्याजवळ तब्बल २ हजार ९७६ लैंगिक शोषणाच्या क्लिप आढळून आल्या होत्या. याप्रकरणी नुकतीच त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्यानंतर कदाचीत एखाद्या राजकीय व्यक्तीच्या नातेवाईकाकडे इतक्या मोठ्या प्रमाणात क्लिप सापडण्याची ही दुसरी घटना असू शकते. मात्र पोलिसांनी अद्याप तरी न्यायालयात क्लिप आणि तरुणींची आकडा सांगितला नाही. मात्र त्यांनी सूचकपणे अनेक अत्यंत आक्षेपार्ह व अशोभनिय व्हिडिओ आणि छायाचित्रे मिळून आल्याचे म्हटले आहे. तसेच ते आरोपीने गैरकृत्य व गैरहेतूने काढलेले म्हटले आहे.

डॉ.खेवलकर हा २७ जुलै रोजी खराडी येथील स्टेबर्ड हॉटेलमध्ये ड्रग्ज आणि मद्य पार्टी करताना पोलिसांच्या जाळ्यात सापडले. यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिसांच्या तपासात धक्कादायक खुलासे

क्रिकेट सट्टा व्यापारी निखिल पोपटानी आणि इतर महिलांसह पार्टीमध्ये सहभाग डॉ. खेवलकरचा सहभाग आढळला होता. त्याने स्टेबर्ड हॉटेलमध्ये रुम बुकिंग, एकूण ४३ दिवस वास्तव्य केले आहे. विविध महिलांसोबत पार्टीनंतरचेही अश्लील फोटो आणि व्हिडिओ पोलिसांच्या ताब्यात आहेत. हे सर्व गैरकृत्य हेतुपुरस्सर चित्रीत केल्याचे प्राथमिक अंदाज.

महिला आयोगाने उचलले पाउल : तातडीची चौकशीचे आदेश

सानवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या तक्रारीनंतर, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने याची गंभीर दखल घेतली आहे. आयोगाच्या म्हणण्यानुसार, खेवलकर यांनी तब्बल २८ वेळा परप्रांतीय महिलांना आमिष देऊन हॉटेलमध्ये बोलावले, आणि ही बाब मानवी तस्करीसारख्या रॅकेटकडे निर्देश करत आहे.

# पुण्यात २ वर्षांपासून वीजचोरी, रिमोट कंट्रोलने ७७,१७० युनिट चोरले; MSEB ने अखेर पकडला, १९ लाखांचा दंड

पुणे : महावितरणच्या वीजचोरीच्या घटना सातत्याने घडतात, अनेकदा शेतकऱ्यांवर वीजचोरीचा आरोप केला जातो. मात्र, उद्योगविश्वासतही सरकारी वीजेचा सातत्याने चोरी होत असते. पुण्यातील भोसरी एमआयडीसीमध्ये अशीच वीजचोरीची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे गेल्या २ वर्षांपासून ही चोरी करतण्यात येत होती, अखेर या कंपनीच्या मालकाकडून तब्बल १९ लाख १९ हजारांचा दंडही वसुल केला आहे. एका औद्योगिक (चखऊ) ग्राहकाकडून रिमोटचा वापर करुन केली जाणारी वीजचोरी महावितरणने नुकतीच उघडकीस आणली असून, या ग्राहकाकडून महावितरणने १९ लाख १९ हजारांचा दंड वसूल केला आहे. तसेच वीजचोरीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले आहे.



महावितरणचे अध्यक्ष तथा लोकेश चंद्र यांनी वीज वितरण हानी कमी करण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते. त्यानुसार महावितरण पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी वीजचोरी विरोधात मोहीम तीव्र करण्याच्या सूचना दिल्या. गणेशखिंड मंडलाचे अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड व भोसरी विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांनी खास पथक तयार केले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्या नेतृत्वाखाली सहा. अभियंता गजानन झापे, वीज कर्मचारी हर्षद लोखंडे, सोमनाथ गायकवाड, महेश वाघमारे यांनी भोसरी एमआयडीसीमध्ये तपासणी सुरु केली. तेंव्हा मे. गणेश प्रेसिंग या औद्योगिक ग्राहकाकडून रिमोटद्वारे वीजचोरी केली जात असल्याचे आढळले. वीजचोरीसाठी वापरलेले सर्व साहित्य महावितरणने जप्त केले आहे. तसेच या ग्राहकाला मागील दोन वर्षांमध्ये केलेल्या ७७,१७० युनीटच्या वीजचोरी पोटी १९ लाख १९ हजार ३६२ रुपयांचा दंड व २ लाख ३० हजारांचे तडजोड आकाराचे देयक देत दंड वसूल करण्यात आला आहे. महावितरणच्या या कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

# आमदारांचा लोणावळा नगरपरिषदेवर हल्लाबोल

लोणावळा : लोणावळा नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभारावर आमदार सुनील शेळके यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील विविध प्रलंबित प्रश्नांमुळे संतप्त झालेल्या आमदारांनी प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला. शहरातील विकासकामांतील दिरंगाई आणि निष्क्रिय प्रशासन यावर त्यांनी आढावा बैठकीत सडकून टीका केली.



भांगरवाडी उड्डाणपुलाच्या भूसंपादन प्रक्रियेत होत असलेल्या विलंबावर त्यांनी नाराजी व्यक्त केली, तर शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी आवश्यक असलेला डीपीआर अद्याप तयार न झाल्याने त्यांनी प्रशासनाला जाब विचारला.खंडाळा परिसरात विद्यार्थ्यांसाठी नव्या शाळेच्या जागेच्या भूसंपादनात काहीजण राजकारण करत असून त्यामुळे शिक्षणाचं मोठं नुकसान होत असल्याचा आरोपही आमदार शेळके यांनी केला.

विद्यार्थ्यांच्या भवितव्यासोबत खेळणं म्हणजे समाजविघातक कृत्य आहे, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला. या बैठकीत नगरपरिषदेचा कारभार अत्यंत निराशाजनक असल्यचेही स्पष्ट केले. येत्या १ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर सभा घेऊन कामांचा लेखाजोखा विचारणार असल्याचा इशारा दिला.

शहरात वाढत असलेल्या अवैध धंदे आणि अंमली पदार्थांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी सूचनाही त्यांनी पोलिसांना केली. वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी ५० नवीन ट्रॅफिक वॉर्डन्सची नियुक्ती लवकरच करण्यात येईल. नागरिकांच्या प्रश्नांवर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असंही त्यांनी ठामपणे सांगितलं. जर प्रशासनाने योग्य काम केलं नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरण्यास देखील तयार आहोत, असा स्पष्ट इशाराही शेळके यांनी दिला.